# प्रकरण ३

# 'बुझ्र्वागमन' या दिवाकर चौधरी यांच्या कादंबरीतील आशयसूत्र व इतर घटकांची चिकित्सा.

## प्रकरण ३

## 'बुझ्र्वागमन' या दिवाकर चौधरी यांच्या कादंबरीतील आशयसूत्र व इतर घटकांची चिकित्सा

---

१) कथानक

२) व्यक्तिचित्रण –

लेखक

कल्पना

लेखकाचे वडिल (बाप्पा)

लेखकाची आई

विकास

नामदेव

भानावाईंडर

३) भाषाशैली

४) निवेदन

५) बुझ्र्वागमनची प्रेरणा

६) समर्पक शीर्षक

७) आशय

दिवाकर चौधरी यांच्या 'बुझ्र्वागमन' या कादंबरीची प्रथमावृत्ती अनुबंध प्रकाशन, पुणे यांनी जानेवारी २००७ यावर्षी प्रकाशित केली. १९७५ च्या आसपास ग्रामीण साहित्य चळवळ निर्माण झाली. ग्रामविकास, नवे तंत्रज्ञान, शिक्षण प्रसार इ. मुळे ग्रामीण जीवन बदलून गेले. बदलत्या ग्रामीण जीवनाबरोबर समस्याही निर्माण झाल्या. ग्रामीण साहित्य चळवळी निर्माण झाल्या आणि त्याचे चित्रण मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये झाले.

जातीयवादी राजकारणाचे वाढते प्राबल्य, शिक्षणाच्या सार्वत्रिकरणातून लोकांचे विचार बदलले, शोषणाचीही जाणीव वाढली. बेरोजगार भ्रष्टाचार व बदलता ग्रामीण परिसर या सर्वातून आपल्या वेदनेला दुःखाला आपल्याच बोलीभाषेतून समाजासमोर आणले पाहिजे. या भावनेतून चळवळी निर्माण झाल्या. आनंद यादव, नागनाथ कोतापल्ले, चंद्रकुमार नलगे, रा. रं. बोराडे यासारख्यांनी ग्रामीण साहित्य चळवळीला समृद्ध बनवून मराठी साहित्य शारदेच्या मंदिरात समर्थ असे व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

काळाच्या ओघात संपूर्ण जगच दळणवळणात्मक पातळीवर अत्यंत लघुत्तम ठरले तेथे देशांतर्गत मराठी समाजातही ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही पातळीवर जोरदार अभिसरणात्मक प्रक्रियांनी वेग घेतला. या दोन्ही स्तरावरील दळणवळण वाढले. यास्तर भेदामधून झालेल्या परिणामांनी वास्तव बदलले आणि त्याचा परिणाम साहित्यावरही झाला. साधारणतः १९७५ नंतरच्या साहित्यिक वातावरणामुळे या प्रमुख घटनांसहित अनेक गोष्टीत बदल झाले आणि या गोष्टीचा परिणाम साहित्यावरही झाला.

१९७५ च्या आसपास ग्रामीण साहित्य चळवळ निर्माण झाली. दलित साहित्यातील विद्रोह आणि सर्वांना सर्वधर्म समभाव मिळण्याच्या आग्रही भूमिकेच्या पाठोपाठ निर्माण झालेली ही सर्वात मोठी साहित्य चळवळ होय. सामाजिक व्यवस्थेअंतर्गत दबलेपणाच्या भावनेतून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक अंगाचे दर्शन स्वाभाविकतेने व्हावे. वेगवेगळ्या अविष्कारातून सांस्कृतिक अस्मितेचे नवजागरण घडावे अशा अपरिहार्य परिस्थितीतून ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, दलित साहित्य अशा वेगवेगळ्या चळवळी निर्माण झाल्या. ह्या चळवळी निर्माण होण्यापाठीमागे अनेक कारणे होती. त्यापैकी काही कारणे म्हणजे

समाजाच्या साहित्याकडून वाढलेल्या सामूहिक आकांक्षा, शिक्षणामुळे व्यवस्थेतील शोषणांची प्रखर जाणीव, जातीयवादी राजकारण, भ्रष्टाचार, बेरोजगारी, नवश्रीमंत वर्ग आणि कनिष्ठ मध्यम वर्ग यांच्यातील वाढणारी दरी इत्यादी कारणांनी आपल्या वेदना, सुखःदुखादी भावनांना आपल्या मूळ ग्रामीण वास्तवातून वाट करून द्यावी या भावनेतून या चळवळी निर्माण झाल्या. आनंद यादव, चंद्रकुमार नलगे, नागनाथ कोतापल्ले, रा. रं. बोराडे यासारख्या ग्रामीण लेखक समीक्षकांनी या चळवळीला वैचारिक व्यापक पाठबळ आणि एक समर्थ समावेशक अलौकिक असे व्यासपीठ निर्माण करून दिले. साहजिकच या चळवळीमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पसरलेल्या ग्रामीण संस्कृतीतून ग्रामीण तरूणाला आपले अनुभव व्यक्त करण्याची प्रेरणा मिळाली. लेखनासाठी एक पाठबळ मिळाले आणि याचे फल स्वरूप म्हणून १९७७ नंतरचे निरनिराळे विषय व आशय शद्बबद्ध करणारी वास्तववादी कादंबरी विस्तारीत झाली.

कादंबरी परंपरेला ग्रामीण साहित्य चळवळीच्या वास्तववादी विस्ताराबरोबरच आणखी एक महत्वाचा फायदा झाला. तो म्हणजे अनेक जाती जमातीमधून आणि महाराष्ट्रातील प्रचलीत बोलीमधून ग्रामीण कादंबरी शद्बबद्ध झाल्यामुळे प्रमाण भाषेतील बंदिस्त प्रवाहाला निव्वळ हादरा बसला असे नव्हे तर बोलीच्या प्रवाही खळखळत्या देशी बाजाने प्रमाण भाषेत अनेक नव–नवीन शद्बांचा समावेश झाला. एवढेच नव्हे तर बोलींची अंगभूत लयसुद्धा नव्या कादंबरीतील भाषेला मिळाली. ग्रामीण साहित्य चळवळीचे सर्वात मोठे यश म्हणजे मराठी भाषिक समृद्धीची जोपासना होय.

ग्रामीण कथाकार म्हणून आधी विश्वास आल्यानंतर कादंबरी लेखनाकडे वळणाऱ्यांमध्ये पुरूषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, राजन गवस, अशोक व्हटकर, वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य चळवळीचे अधिष्ठान देणारे नागनाथ कोतापल्ले इत्यादीनी आपआपल्या प्रदेशातील ग्रामीण वास्तवाला कादंबरीच्या द्वारासामोरे आणले.

जगण्याच्या पातळीवर वास्तवाचे प्रखर खोलवर भान जाणून जन्मकालीन वास्तवादी प्रेरणेचे आपल्यातून सर्जनात कृतीशीलतेत करणारी प्रचलीत काळातील वास्तववादी कादंबरी नवी नैतिकता जोपासते आहे. प्रचलीत काळातील वास्तवातले आशयदृष्टे बांधीलकीच्या गंभीर भानातून स्विकारून त्यांचे जसेच्या तसे वास्तववादी वर्णन, समर्पकपणे चित्रण आपल्या स्वतःच्या स्वतंत्र शैलीचा आश्चर्यकारक अविष्कार कादंबरीमध्ये दिवाकर चौधरींनी केला आहे.

दिवाकर चौधरींनी त्यांच्या एकूण कादंबरीचा विचार पुढील प्रकरणामध्ये याच पद्धतीने केला आहे. कथानक व्यक्तिचित्रण, भाषाशैली, आशय इ. घटकांनी युक्त असे कादंबरीचे आगळेवेगळे स्वरूप या घटकांमुळे कादंबरीला आलेली वैशिष्ट्यपूर्णता यांचाही सविस्तर विचार केलेला आहे.

माणसाला आपले दुःख आनंद केव्हातरी का होईना कुणाला ना कुणालातरी सांगावेसे वाटते. अंतर्मनात मनाच्या गाभाऱ्यात कुठल्यातरी कप्प्यात खदखदत असणारे उन्मळून, उचंबळून येणारे बाहेर पडण्यास आतूर असलेले सांगितले पाहिजे असे वाटते. हे सांगितले म्हणजे आपण भोगलेले सोसलेले किंवा आपल्या समाजाला सोसावे लागलेले जे काही असेल ते भोगताना, सोसताना जो मानसिक, भावनिक, वैचारिक आणि शारिरिक जो ताण त्यांच्यावर पडलेला असतो. तो कुठे तरी हलका झाल्यासारखा वाटतो. वास्तविक जे त्यांनी अनुभवले, सोसले, भोगले ते सर्वोतपरी त्यांचे स्वतःचे एकट्याचे आहे असे नाही तर संपूर्ण शेतकरी समाजाचे आहे. अशाच उद्विग्न अवस्थेतून चौधरींनी 'बुझ्र्वागिमन'चे लिखाण करून आपल्याला आलेले अनुभव आणि शेतकरी समस्या शद्बबद्ध केल्या आहेत म्हणून दिवाकर चौधरी म्हणतात, ''या देशातल लोखंड कितलबी महाग होओ, सोनं कितलबी महाग होओ, लाकुड कितलबी महाग होओ, का कोणाचीबी गोष्ट कितलीबी महाग होओ कोन्ही झाट बोंबलत नाही, अन् जिवारी, गहू, तांदूळ, महाग झाले की पेपराई सकट सगळे बोंबलतात. तेलावऱ्हे अन् साखरेवऱ्हे या देशाचं राजकारण चालतं. ए बहिनझ्रु सगळ्या शेतकऱ्याईन हे पेरनच बंद करी टाक्याले पाहिजे. घ्या उप्पाडीसन् सस्ती पाहिजे गधडीच्याईनले जिवारी सस्ती अन् आम्ही का लोसन सोला. सोनं लोखंड खा गधडीच्याईहो!''[१]

शेतकरी समाजाची दुःख, वेदना, व्यथा व त्या शेतकरी समाजाची होत असलेली पिळवणूक त्यांचे जीवन चित्रण लेखकांनी आपणासमोर उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा निवेदनाला अनुभवाला, अनुभव कथनाला, जेव्हा अक्षररूप प्राप्त होते तेव्हा एका साहित्यकृतीचा जन्म झालेला असतो. ती साहित्यकृती लेखकांच्या अंतरिक जीवनाचा अनुभव असते. आणि त्यातून ती आपल्या मनात दबून राहिलेल्या शद्बांना वाट करून देत असते.

मराठी साहित्यात ग्रामीण साहित्य प्रवाह निर्माण झाला असून या साहित्य प्रवाहाने मराठी साहित्याला समृद्ध केले आहे. ग्रामीण साहित्यप्रवाहातील लेखक दिवाकर चौधरी हे डांभूर्णी, ता. यावल या गावचे असून फैजपूर साखर कारखान्याचे संचालक होते. नव्या पिढीतील वास्तववादी ग्रामीण कादंबरीकार म्हणून त्यांची ख्याती आहे. बदलणाऱ्या ग्रामीण समाजाचे शेतकऱ्यांच्या समस्यांचे, शेतीच्या आधुनिकीकरणाचे, सुशिक्षित बेकारीचे, सावकारकीचे, निसर्गाचे, अंदाधुंदीच्या राजकारणाचे, रोजगाऱ्यांचे, शेतकऱ्यांचा वेळोवेळी गळा कापणाऱ्या व्यापाऱ्यांचे तसेच शेतकरी लोकांविषयी कुतूहल असणाऱ्या व शेतकरी सुखी आहे असे म्हणणाऱ्या लोकांचे चित्रण अतिशय समर्पक व परखड शद्वात शद्वबद्ध केले आहे.

**१) कथानक :-**

दिवस उगवला होता तरी वाड्यात सामसूम होती. काहीच हालचाल नव्हती. सगळे झोपले होते हे पाहून लेखकांना आपल्या गावातील पूर्वीचे उत्साहाचे दिवस आठवले. पूर्वी नोकर-चाकर पहाटे उठत मालकाने न सांगताच कामाला लागत. मालकांनाच आपला देव मानत. मजूरही वर्षानुवर्षे त्याच त्या घरी रहायचे. काही वेळेला तर पूर्ण वर्ष संपल्यावर कामाचे मोल ठरायचे पण ही चाकर मंडळी काहीही बोलत नसत. सगळीकडे कसा उत्साह होता. पण आता तस काहीच राहिले नाही. आता मालक झाले नोकर अन् नोकर झाले मालक! अशी अवस्था होऊन बसली आहे.

शेतकऱ्यांच्या मुलांच्या लग्नाची अवस्था तर खूप बिकट झाली आहे. लग्नाच्या स्थळासाठी छोटे व्यावसायिक अथवा नोकरदार असला तरी सोयरीक जुळवतील, परंतु शेतकऱ्याच्या घरी सोयरीक नको. पूर्वी लोक म्हणत उत्तम शेती, मध्यम व्यापार कनिष्ठ नोकरी, परंतु आता सर्व परिस्थिती बदलली आहे. उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती. काही वर्षापूर्वी साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने, अर्ज केला की कुठेही नोकरी मिळत होती. आताच्या काळात कितीतरी मुले शिकली आहेत. पण त्यांना नोकऱ्या नाहीत अशी बिकट अवस्था निर्माण झाली आहे. लेखक तेव्हाचे पदवीधर, भरपूर संपत्ती, एवढी जमीन कोण सांभाळणार म्हणून चांगली नोकरी सोडली आणि लागले जमीनीच्या नादाला काळी माऊली कृपेची सावली.

गरीबांना छळणाऱ्या श्रीमंत लोकांचा लेखकांनी धिक्कार केलेला दिसतो. टि. व्ही.च्या माध्यमातून कृषीविषयक कार्यक्रमात तज्ञ सांगत असतात, हरभऱ्याचे भरघोस पीक कसे घ्यावे? करडईला मात्रा कशी द्यावी? ऊसाची अशाप्रकारे लागवड करा. परंतु प्रत्यक्ष मात्र परिस्थिती काय आहे याची जाणीव कोणालाच नसते.

लेखकांच्या पत्नीने लेखकांना उठवण्यासाठी खालून हाक मारली कारण वाड्यात सगळी कामे तशीच पडली होती. नामा अजून आला नव्हता. त्याचा लेखकांना राग आला. नामा आल्यावर नाम्याला लेखक बडबडणार होते, पण कल्पनाने थांबवले. कारण नामा एकदा का रागाने निघून गेला तर, पुन्हा गुरांचे कोण बघणार. वाड्यातली सगळी काम एकट्यालाच करावी लागतील. वाड्यातील एक म्हैस लेखकांनी कसाबाला विकली म्हणून कल्पना खूप दुखावली होती. एवढ्यात नाम्या येतो. लेखक राग आवरतात. कारण नाम्याशिवाय पर्याय नव्हता. वर्षभर जनावरे पाळायची, वाड्याची झाडझुड करायची, रानातले बघायचे ही सर्व कामे नाम्याला करावी लागत.

थोड्या वेळाने विकासही कामावर आला. दोघांनी मिळून वाड्यातली सगळी कामे आवरली. विकास उशिरा आला की नाम्याला खूप राग येत असे. तेव्हा नामा खूप बडबड करी. कारण विकास नसला की त्याला एकट्यालाच काम करावे लागे. याचा लेखकाना राग येई पण पर्याय नव्हता. नामा निघून गेला तर पैसे बुडणार कारण दिलेल्या पैशाचे काहीच पुरावे नसतात. आणि पुराव्यासाठी पैसे दिल्यावर मजुरांची सही घ्यावी तर एवढा विश्वास नाही का? हे ऐकून घ्यावे लागते. सर्व शेतकऱ्यांची हीच अवस्था असते. लहान शेतकऱ्यांची अवस्था तीच मोठ्या शेतकऱ्यांची असते. लेखक वाड्यात होते तेवढयात मोटर दुरूस्त करणारा रामा आला. रामा बारकरी याला पाहिल्याबरोबर लगेच लोक काय झाले म्हणून विचारतात. कारण मोटर तर बिघडली नसेल अशी त्यांना शंका असते. कारण मोटर बिघडली की शेतकऱ्याला काळजी वाटते. कारण त्यामुळे पीकाला पाणी मिळत नाही. तसेच बुधवारची मजूरी द्यावी लागे. नाही दिली तर गावात पंचनामा आणि त्यात मोटारीचे दुखणे. इतराना मोटार बिघडणे म्हणजे शुल्लक गोष्ट वाटे. मोटर बिघडली की शेतकऱ्यांचे कशातच लक्ष लागत नसे. मोटर चालू करताना एखाद्याला करंट लागला आणि तो मेला तर ती आणि वेगळीच काळजी आयुष्यभर त्याचं मनावर ओझं. मोटार दुरूस्त करायला गेले तर मोठा पाना सापडेना काही लोक

तर वस्तू नेतात आणि पुन्हा माघारी आणूनच देत नाहीत. त्यामुळे आयत्या वेळी खूप अडचण येते. एकतर वस्तू कोणाला दिली, हे ही आठवत नाही. एकदाची मोटर दुरूस्त झाल्यावर शेतकऱ्याना समाधान वाटते. एक ओझं डोक्यावरून उतरले की दुसरे मागे लागलेले असतेच. मोटार दुरूस्त झाली तर आता दुसरी एखादी समस्या पुढे उभी असतेच. एक झालं की एक शेतकऱ्यांना सुट्टीच नाही. मोटार दुरूस्त झाली तर आता ज्वारीच्या राखणीचे काम पुढे उभे राहिले. मोटर दुरूस्त करणे आवश्यक होते त्यामुळे इतर गोष्टीकडे लक्ष देता आले नाही. बाग हा मुख्य स्त्रोत कर्ज फेडायचा. कारण ज्वारी कर्ज फेडू शकत नाही. खूप पोती ज्वारी होते पण शेवटी हातात काहीच रहात नाही. तरीही शेतकरी दरवर्षी ज्वारी पेरतोच. दरवर्षी बागही लावता येत नाही. कारण त्यामुळे शेतजमीन पांचट होते. ज्वारी पेरल्यामुळे पैसे हातात येत नसले तरी घरभरून धान्य रहाते. गुरांना वैरण मिळते. म्हणून शेतकरी ज्वारी पेरतात.

शेतकऱ्याचे शेत असले तरी शेताच्या कडेचे बांध रोजगाऱ्यांचे, मालकांच्या म्हशींना मात्र काहीच मिळत नाही. बांधाचे गवत या रोजगाऱ्यांची जनावरे खातात. शेतकऱ्यांच्या बांधावरचे गवत कापण्याचा सरकारने यांना परवाना दिला आहे का? रोजगाऱ्यांच्या म्हशींना चिमटा घेतला की रक्त निघते. अन् मालकाच्या म्हशी कंबर तोलतात आणि वर म्हणतात आम्ही फक्त वेळ पडली तर गवत चोरतो. फक्त गवताचे चोर असते तर दुर्लक्ष केले असते. पण सगळ्याच गोष्टींचे ही माणसं चोर आहेत. शेतात घरापुरता लावलेला भाजीपाला सुद्धा ते राखत नाहीत. वांगी, शेंगा सगळं चोरतात.'सापडला तर चोर, नाही तर शिरजो' या म्हणी प्रमाणे त्यांना काहीच बोलता येत नाही. कारण वेळोवेळी त्यांची गरज लागते.

बागाईतदार शेतकऱ्यांचे बरे असते, निदान ऊस तरी लावता येतो. पाणी असल्यामुळे शेत हिरवगार दिसते. तसेच गवत, ऊसाचे वाढे जनावराना मिळते. शेत हिरवगार बघितल्यामुळे सावकार म्हणा, व्यापारी वेळ पडली तर उचल तरी देतात. कोरडवाहू शेतकऱ्यांना तर ज्वारी पेरावीच लागते. तीळ, कपाशी यासारख्या पीकांशिवाय पर्याय नसतो. लेखकांनी या एका–एका पीकाचा पंचनामा या कादंबरीत करण्याचा प्रयत्न केला आहे. जेणेकरून कादंबरी वाचून तरी लोकांना शेतकऱ्यांची अवस्था लक्षात येईल.

तीळाचा भाव १० रू. वाढला म्हणतात पण हातात काय पडते. तीळ पेरला तर शेताच्या मशागती पासून तीळ काढून घरी आणेपर्यंतचा हिशोब केला तर शेतकऱ्यांच्या हातात काय रहाते. २९,२०० स्क्वेअर फूटात फक्त एक नाहीतर दीड पोते तीळ मिळतात. आणि मध्येच पाऊस पडला तर तेही पदरात पडत नाही. मग शेतकऱ्यांनी घातलेले भांडवल कुठे शोधायचे. तीळाचे शुद्ध तेल पाहिजे आणि त्याचा थोडा जरी भाव वाढला तर लगेच ओरड करतात. मग शेतकऱ्यांनी नेमके काय करायचे. मग बाकीचे हे लोक म्हणणार जर तुम्हाला हे पीक परवडत नाही तर मग कशाला पेरता मग काय पेरायचं सगळ्याच पिकांची हीच अवस्था आहे. जवस, तूर पेरली तरी हीच ओरड कोण म्हणते हे पीक घ्या, तर कोण म्हणते हे पीक घ्या खूप परवडणार पीक आहे पण शेवटी 'तेल पण जातं तूप पण जातं, आणि हातात धुपाटणं रहातं'.

तूर पण असेच नावजलेले पीक. जिकडे तिकडे पेपरमध्ये फोटो. फक्त ठराविक पद्धतीने करावी लागते. जो तो तूर पेरतो. आणि शेवटी पदरात काय पडते, हे लक्षात आल्यावर या पाठीमागचे गणित कळते. असा शेतकऱ्यांच्या जीवनाचा एक-एक प्रश्न आहे. कोणताही प्रश्न असला तरी शेतकऱ्याचाच तोटा हे त्याच उत्तर आहे.

देशातले लोक जे अन्न खातात. गहू, तांदूळ ते अन्न शेतकऱ्यांना परवडते का याचा त्यांनी थोडा जरी विचार केला, तर शेतकऱ्यांच्या जीवनाचे सार्थक होईल. एकदा ज्वारीला चांगलाच भाव आला होता. शेतकऱ्यांनी ज्वारी जास्त पेरली असती, तर त्यांचा फायदा झाला असता; असे उशीरा शहाणपण येते. पण शेतकरी तेव्हाही जागे झाले नाहीत. जी दोन-अडीच बिघेच ज्वारी पेरली होती. ती नीट न राखल्यामुळे पाखरांनी खाऊन टाकली. हे बघितल्यावर शेतकऱ्याच्या जीवाचे पाणी-पाणी होते. शेतकऱ्यांना आपल्या वाट्याला आलेले दुःख कोणाला ना कोणाला सांगावेसे वाटते.

शेतकी खात्याच्या पुस्तकात पीकाची माहिती चित्रासह रहाते. ते पुस्तक बघत बसावं असं वाटतं, कारण मोठ मोठे टॉमेटो, केळीचे घड, वाटाण्याच्या शेंगाचे चित्र असतं. त्या पुस्तकात काय करावं, कसे फवारे मारावे, उत्पन्न कसे वाढेल या सर्व गोष्टींची नोंद असते. पण त्यामध्ये शेतकऱ्यांना जे नडते ते मात्र नसते. या पुस्तकात शेती विषयी सर्व माहिती असते परंतु शेतकरी बांधवांविषयी काहीच सांगितलेले नसते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रत्येकजण म्हणत असतो आम्हाला परवडत नाही. मग परवडते कोणाला नोकरदार, व्यापारी म्हणतो आम्हाला परवडत नाही. मग काय शेतकऱ्याला परवडते. 'शेतकरी राजा आहे, गरीब किसान!' अशी अनेक विशेषणे शेतकऱ्याला लावतात. परंतु हे सर्व वरवरचे असते.

मोटर प्रकरण संपताच बरोबर लेखकांच्या डोक्यात ज्वारी पुराण सुरू झालं मोहाच्या मळ्यात लेखक ज्वारीच पीक पहायला गेले होते. तर ज्वारी राखणारा म्हातारा निवांत झोपला होता. जागे झाल्यावर मालकांना पाहून खिजला . लेखकांनी शेतातील ज्वारीवर नजर टाकली तर पाखरांनी ती खाल्ली होती. इतक्या दिवस ज्वारी भरपूर होती तर दर नव्हता. आणि ह्या वर्षी दर आहे तर ज्वारीच नाही. शेवटी काहीजरी झाले तरी शेतकऱ्यांच्या वाट्याला परवडच.

शेतकऱ्यांमध्ये एकी नसल्यामुळे प्रत्येकजण त्यांना लुबाडत असतो. प्रत्येकाला आपल्या मळ्यातला टोमॅटो जास्त दराने विकावा वाटतो तर दुसऱ्यांच्या मळ्यातली भेंडी कमी दरात मिळावी असे वाटते. अशी अपेक्षा न करता, शेतकऱ्यांनी एकी करून आपल्या मालाला दर मिळवला पाहिजे. समजा, पंजाब मधील गहू कमी दरात विकला तर इतर देशातल्या शेतकऱ्यांनी त्याविरूद्ध आंदोलन केले पाहिजे. प्रत्येकाला खात्री पटली पाहिजे की आपल्या देशातला शेतकरी हे सहन करणार नाही. शेतकऱ्यांनी जर एकी केली तर देशातलाच काय जगातला शेतकरी अजिंक्य राहिल. शेतकऱ्यांच्या स्थितीला निसर्ग जबाबदार धरता येणार नाही. पाणी नाही त्या ठिकाणी एक ठिक आहे. पण ज्या भागात पाणी आहे त्या भागातील शेतकरी तरी कुठे सुखी जीवन जगत आहेत. तिथे पाणी आहे पण तिथले प्रश्न वेगळेच आहेत.

ऊस तोड करणाऱ्या मुकादमांचीही खूप वाईट अवस्था आहे. मजुर आधीच रक्कम घेतात अन् पुन्हा टोळीत येतच नाहीत. असे कितीतरी मुकादम देशोधडीला लागलेले आहेत. शेवटी त्यांच्यावर मजुर होण्याचीच वेळ येते.

देशात ८० टक्के शेतकरी आहेत असं म्हणतात. पण तसं असतं तर, शेतकऱ्यांनी तुम्हाला बोलू दिल नसतं. कारण शेतकऱ्यांपेक्षा शेतमजुरच जास्त आहेत. कोणताही मजुर आता काम करायला तयार नाही. मग तो शेतमजुर असो वा औद्योगिक मजुर श्रम न करता पैसे मिळाले पाहिजेत अशी सवय लागली आहे. यापुढे आम्ही असं खपवून घेणार नाही असे सांगितले पाहिजे. आम्ही

स्वतः आमच्या शेतात राबू आणि आमची संघटना कायम ठेवू. मग कोण शेतकऱ्यांना चॅलेंज देतं ते पाहू.

शेतकऱ्याला असे वाटते की प्रसारमाध्यमांनी जे लिहायचे आहे ते खरच लिहावं, जनतेची दिशाभूल करू नये. बागायतदार म्हटलं की कसा रूबाबात राहतो. आता ऊसवाला शेतकरी अनेक ठिकाणी दिसू लागला आहे. त्यामुळे ऊसवाल्या शेतकऱ्यांचे दुखणं आता समजू लागले आहे.

शेतकरी आपल्यावर होणाऱ्या अपमानांना वेळोवेळी गिळत असतो. या अपमानांचा साठा प्रचंड होतो. मग हा साठा बाहेर फेकणे पडतेच म्हणून मग हे शेतकरी बांधव हा राग आपल्याच भाऊबंदांवर काढतात. तू माझ्या वावरात सरकलास, हा रस्ता तुला वापरता येत नाही अशा अनेक कुरापती काढतात. कारण मनातला राग कुठं ना कुठं जिरवायला लागतोच. मग आपण पेपरमध्ये वाचतोच बांधावरून अमुक–अमुक गावात मारामारी झाली त्याचं मूळ हे आहे.

पेपर हा खेडोपाडी आता पोहचू लागला आहे. पेपर मध्ये वाचून तरी लोक शहाणे होतील असे लेखकाना वाटत होते. परंतु आता पेपरचीही अवस्था वाईट झाली आहे. संपादक पेपरचा खप होण्यासाठी वाट्टेल तसे छापतात. नाहीतर काहीवेळा त्यांनी कोणाकडून तरी पैसे घेतलेले असतात. त्यामुळे ते सांगतील तसच छापतात त्यामुळे पेपर वरचाही लोकांचा विश्वास उडाला आहे.

अंधार पडू लागल्यावर नाम्या, मोहन्या घरी आले. वाड्यातलं काम आटपल वाड्यातल्या म्हशी टकमक बघत होत्या. त्याना पोटभर चारा मिळाला नव्हता. त्यामूळे त्या भरपूर दूध देत नाहीत. घरच दूध पाहिजे म्हणून शेतकरी म्हशी पाळतो. नाहीतर त्या बिलकूल परवडत नाहीत. शेतकऱ्यांपेक्षा मजुरांकडे जनावरे जास्त असतात. कामाला गेल्यावर हेच मालकांच्या बांधाचे मालक त्यामुळे त्यांची जनावरे चांगली असतात.

काही शहाणे लोक व्यापारी लाईनची शेती करा म्हणतात. शेतीला जोडधंदा पाहिजे. जोडधंदा करा म्हणजे शेतीत फायदा नाही असच ना. केळीच्या बागेची विक्री झाल्यानंतर त्या रानातले खोड उकरून काढण्यासाठी मोहनला सांगितले. त्याच्या अंगावर ते काम दिले. पैशाची अडचण असल्यामुळे वाड्यातली म्हैस विकायला काढली हे कल्पनाला आवडले नाही. कारण वाड्यातलं जनावर विकणे तिला अजिबात आवडत नाही. त्यामुळे वाड्याला बरकत येत नाही असे तिला वाटते.

चांगदेव सरोदेला चार हजाराला म्हैस विकली ती म्हैस विकण्यासाठी म्हशीचा दर ठरविताना जी चर्चा झाली त्याचे इतरांना काहीच वाटत नाही. परंतु शेतकऱ्यांच्या जगात याला खूप महत्त्व आहे. वाड्यात जनावरे असणे म्हणजे वाड्याला खूप शोभा असे पण आता जनावरे कमी झाल्यामुळे वाड्याला अवकळा आली आहे. वाड्यातली जनावर म्हणजे कुटुंबातला एक भाग असल्यासारखा वाटते.

लेखकांच्या वडिलांना गावात खूप मान होता. भुरीचा मळा बाप्पाच्या नावानेच ओळखला जायचा. बाप्पाच्या पुढे कोण बोलत नसे. आता बाप्पाचे वय झाले होते. त्यांना कोणी काही विचारून करत नसे. त्यामुळे त्यांना खूप राग येत होता. बाप्पाने सर्व रानांची व्यवस्थित जोपासना केली होती. भुरीचे रान पडीक होते. त्यालाही ठिबकने पाणी देऊन रान ओलीताखाली आणले होते. रानाच्या बाजुने बोर, सिताफळ, आवळे यांची झाडे होती. बाप्पाच्या काळात रानातून एक ही फळ इकडचे तिकडे होत नसे. बाप्पाचा गावात चांगला वचक होता. सर्व लोक त्याना घाबरत.

नामदेव व लेखक एकदा निवांत बसले होते तेव्हा लेखकांनी आपल्या सर्व परिस्थितीची माहिती नामदेवला सांगितली. त्याबरोबर आपल्यावर किती कर्ज आहे हे ही सांगितले. कारण ही सर्व परिस्थिती ऐकल्यावर तरी नामा जोमाने कामाला लागेल. मालकाची जरा तरी दया येईल. शेतकरी मजुरांशी विश्वासाने वागतो. कारण दोघांच्यातील अंतर कमी होऊन मजुर शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी जोमाने कामाला लागेल. परंतु शेतकऱ्यांनी कितीही प्रेमाने वागा. मजुरांचे जैसे थे वागणे नेहमीचेच. बुधवार जवळ आला होता. पण ह्या बुधवारी अजिबात काळजी नव्हती. म्हैस विकलेले पैसे घरात शिल्लक होते. बुधवारी जर मजुरांना पैसे दिले नाहीत तर गावभर नावाचा पंचनामा होतो. पुरूषांची मजुरी ठरलेली असते. त्यामुळे पैसे दिले की कसलाही वाद न घालता ते निघून जात. मात्र बायकांची मजुरी न ठरल्यामुळे बायका मजुरी वाढवून मागण्यासाठी दर बुधवारी वाद घातल्याशिवाय पैसे घेवून जात नाहीत. लेखकांना त्या बायकांबरोबर वाद घालायला जमत नाही त्यामुळे बायकांची मजुरी भागवायचे काम लेखकांची पत्नी कल्पनाचे असते. त्या बायका गेल्यावर वाड्यात एक प्रकारची शांतता पसरत असे. शेतात बाग आहे, ऊस आहे त्यामुळे खूप लक्ष द्यावे लागते. विहिरीच पाणी आटायला लागल्यावर शेतकऱ्याला खूप काळजी वाटते. विहिर खोदावी तर पाणी लागेलच असे

सांगता येत नाही. मग भांडवल घालून काय उपयोग बागेला आणि ऊसाला पाण्याशिवाय काही उपयोग होत नाही.

लेखक वावरातले खोड उपटण्यासाठी मोहनला बोलवतो. मोहन भिल हा भिल्ल असूनही वागायला कामाला चांगला होता, प्रामाणिक होता. त्याची आई अतिशय संस्कारी देवभक्त होती. ती या समाजातील आहे असे वाटतच नव्हते. ती मराठी आहे असे वाटे. मोहन आल्यावर त्याला १२०० रूपयाला वावरातील खोड उकरायचे काम दिले. आणि कल्पनाला राहिलेले २८०० रूपये खर्च करू नको म्हणून सांगितले असे बोलणे होवून थोडावेळ जातो न जातो तोच नामदेव आला आणि त्याने ५०० रूपये मागितले. त्याला माहित होते घरात म्हैस विकलेले पैसे आहेत. हे एकून दोघानाही काय बोलावे हे कळेना दोघेही विचारात पडली. तेव्हा कल्पना नामदेवला म्हणाली हिशोब केला तर तुमच्याकडेच पैसे निघतील. तरीही नामदेवने आग्रह करून ५०० रूपये घेतलेच. शेतकऱ्यांनी कोणतेही काम योजले तर ते होते असे नाही मध्येच त्यात काहीतरी दुसरच उभं राहतं. नामदेव सारखा मोहन नव्हता. तो हिशोबाला अतिशय बिनचुक होता. तुमचे माझ्याकडे नको माझे तुमच्याकडे नको. विकासही वयाने लहान प्रामाणिक मुलगा होता. तो चांगल्या घरातील होता तो वाड्यात काम करताना कामचुकारपणा करत नसे. त्यामुळे लेखकांचा त्याच्यावर खूप जीव होता.

लेखकाच्या घरातील हिशोबाचे काम त्यांचे वडील पहात. लेखकांना हिशोबाचा खुप कंटाळा येई. त्यामुळे त्यांनी कधी हिशोबाचे काम आपल्यावर घेतले नाही. लेखकांच्या वडिलांचे हिशोबाचे काम अतिशय बिनचूक होते. कितीही वर्षाचा हिशोब विचारला तरी ते बरोबर पटवून सांगत. बाप्पांच्या सारखीच लेखकांच्या आईची स्मरणशक्ती चांगली होती. बाप्पांचे हातपाय थकल्यावर त्यांनी हिशोबाचे काम कल्पनाकडे दिले. लेखकांची आई आजारी पडल्यावर तिने कपाटाच्या चाव्याही कल्पनाकडे दिल्या. तेव्हा पासून कल्पनाच सगळा कारभार पहात असे.

आपल्याला इथे जमीनीच अर्थशास्त्र पहायचं आहे. भावनांमध्ये गुंतून पडायचं नाही. या जमीनीत किती जरी कष्ट केले तरीही काही सुधारणा नाही. लेखकांना पुढे मोठी अडचण उभी राहिल्यामुळे त्यांनी आपल एक शेत विकल. पण त्याना पुरेशी किंमत आली नाही. कारण लेखकांना

पैशाची गरज असल्यामुळे लोकांच्या मागे लागून शेत विकत घ्यायला लावले. त्यामुळे लोकांनी किंमत कमी करून शेत मागितले. हे शेत विकून सुद्धा लेखकांची संपत्ती खुप आहे.

लेखकांचा मोठा मुलगा डॉक्टर आहे. त्यामुळे त्याचे व्यवस्थित होईल. पण लहान मुलगा इंजिनिअरिंगला असताना पहिल्या वर्षी नापास झाला. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास हरवला त्यामुळे तो पुन्हा आपल्यासारखी शेती करेल याची लेखकांना सतत भीती होती. म्हणून जमीन विकावीशी पण वाटत नाही. जुगार आहे जुगार ओपन नाहीतर क्लोज, किंवा क्लोज नाहीतरी ओपन काय करावे हेच कळत नाही. सगळेच शेतकरी जमीन विकू लागले तर जमीन घेणार कोण त्याला किंमतच राहणार नाही.

ज्वारीची खुडणी चालू झाली की खेळ तयार करण्यापासून ते ज्वारी मळून घरी आणेपर्यंत महिना महिना लोक दिवसरात्र रानात राबत आता मात्र तसे काही राहिलेच नाही. ट्रॅक्टर, क्रशर, मशिनरी आली सगळी कामे सहजासहजी होऊ लागली. त्यामुळे कोणाला कोणाची गरज लागत नाही. ज्वारीचा कडबा वर्षभर पुरत नसे. मग कडबा विकत घेण्यापेक्षा कुट्टी विकत घेतलेली परवडते. जनावरेही कुट्टीचा आवडीने फडशा पाडतात. कडबा तोडून घातला की फक्त पाला खात आणि धाट तशीच ठेवत. गावात कडबा विकणारे मोजकेच मात्र विकत घेणारे भरपूर त्यामुळे इतराना कळेपर्यात कडबा संपलेला असे. नाम्यानं आसपासच्या सर्व गावात कडब्याची चौकशी केली. तेव्हा ममुराबादला त्याला कडबा कुट्टी मिळाली. ती ट्रॅक्टरने आणली आणि वाड्यात भरली. त्यामुळे चालू घडीला तरी वैरणीचा घोर मिटला होता.

सुरूवातीला नवीन औषधे, खते निघाली तेव्हा हे औषध फवारा, ते खत टाका म्हणजे जमीनीचा पोत सुधारेल परंतु आता त्या खताच्या आणि औषधाच्या वापराने जमीन नापीक झाली आहे. जमिनीतले कृमी, गांडूळ, वाणी किटक मरून गेले. हे कृमी जमीन भूसभूशीत ठेवत. त्यामुळे जमीनीचा पोत सुधारतो. लोकांनी लवकरात लवकर सुधारणा केली तर बरे नाहीतर सर्व जमीनी नापीक होतील. कोरडवाहू जमीनीपेक्षा गव्हाची जमीन असलेला शेतकरी खुप श्रीमंत समजला जाई. लग्न ठरवताना मुलीचे वडील प्रथम मुलाकडे गव्हाची जमीन आहे का हे पहात. आता बागायत वाढल्यामुळे गव्हाला पहिल्यासारखे महत्व राहिले नाही. हरतऱ्हेची फुले, फळे, भाजीपाला, धान्य याचे उत्पादन निघू लागले आहे.

वर्षभर कामाला राहण्यासाठी गडी ठरवताना त्याला मालकाने विचारले किती ज्वारी घेणार तर गडी म्हणे मला यावर्षी खुप कामे आहेत. त्यामुळे तुम्ही पैसेच द्या. त्यांच्या म्हणण्यावर लेखकांनी विचार केला तेव्हा असे लक्षात आले की ज्वारीला काहीच किंमत नाही. म्हणून हा पैसे मागतो आहे. आणि नंतर वर्षभर पोटाला खायला नाही मग काम कसे करणार म्हणून ज्वारी मागायला रिकामा पैसेच्या पैसे आणि वर ज्वारी.

पूर्वीच्या धान्यासारखी, फळांसारखी चव आजच्या धान्याला फळांना नाही. देशी कोंबडे आणि संकरीत कोंबडे किती फरक आहे चवीत संकरीत कोंबडे अगदी बेचव लागतात. जसे हायब्रीड पिकायला लागले तसे सगळे बेचव झाले. पूर्वीसारखी देशी ज्वारी पेरली तर मग इतक्या लोकसंख्येला खायला काय घालायचे. त्यासाठी संकरित शिवाय मार्ग नाही. जमीनीचा पोत सुधारण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत. त्या त्या केल्या पाहिजेत. माती परिक्षण केलं पाहिजे. गांडूळ खत, शेणखत वापरले पाहिजे. तेव्हा कुठं राहिलेल्या जमीनी वाचतील. नाहीतर पुढे एक बी देखील जमीनीत उगवणार नाही. ज्या जमीनीत २५ वर्ष झाले. बागायत आहे तिला ३ वर्ष पडू द्या तेव्हा तिचा पुन्हा कसं तयार होईल. आता तुम्हाला वाटेल की पुन्हा पुन्हा तेच तेच काय सांगतात. अर्थात त्यांची सकाळ त्यांच्यातच निघते अन् संध्याकाळ त्यांच्यातच बुडते. त्यामुळे हे साहजिकच आहे.

कांदा, कापूस, केळी, तूर, जवस, कोणतेही पीक घ्या सगळ्यांची एकच अवस्था कशातच फायदा नाही. दर आला तर पीक चांगले नाही. आणि पीक चांगले आले तर दर नाही. शेवटी शेतकऱ्यांच्या वाट्याला भोगवटा आहे तो आहेच. शेतीसाठी पीकासाठी काढलेलं कर्ज उत्पन्नातून कधीच फिटलं नाही. उत्पन्न आलं तर दरांनी मार खाल्ला. तर कधी निसर्गानं दगा दिला. तर कधी व्यापाऱ्यांनी नागवलं असा फेरा सतत चालला आहे. कारण तेल, साखर, कांदा, ज्वारी यांचे भाव थोडे जरी वाढले तरी सत्ता कोसळते त्यामुळे या राजकिय मानसिकतेचे पहिले बळी शेती व शेतकरीच रहात आले आहेत. खेड्यातील पोटभरू शेतकऱ्यांना सुद्धा जगण्यासाठी स्पर्धा करावी लागत आहे. मग तो अंगठा बहाद्दर असो वा सुशिक्षित. त्याला कष्टाबरोबर आर्थिक साहस करावेच लागत आहे. भले तो आंबा, द्राक्षे, ऊस, संत्रा, डाळिंब बागायतदार असो. या जीवघेण्या संघर्षातून उभं रहातं ते वैभव. हे उभं राहणारं वैभव खरोखरच किती सुखी किती दुःखी आहे, किती कष्टमय आहे,

याचं यथार्थ दर्शन दिवाकर चौधरी यांनी 'बुझ्र्वागमन' या कादंबरीतून घडविले आहे. शेतकऱ्यांचे दुःख, वेदना उलगडून दाखविण्याचा त्यांचा हा प्रयत्न अतिशय सामर्थ्यशाली आहे.

**२. व्यक्तिचित्रणे :-**

कादंबरी म्हटलं की कादंबरीत व्यक्तींचे जाळे असते. अनेक पात्रे कादंबरीमध्ये वावरत असतात. काही पात्रे मुख्य असतात तर काही पात्रे गौण असतात. परंतु 'बुझ्र्वागमन' या कादंबरीमध्ये मात्र फारशी पात्रे वावरताना दिसत नाहीत. मोजक्याच पात्रांचा वावर या कादंबरीमध्ये दिसतो. जरी पात्रांची संख्या भरपूर नसली तरी लेखकांनी कादंबरीला एक वेगळेच वळण देऊन तिचा शेवट केला आहे. कादंबरीमध्ये ते जास्तीत जास्त शेतकऱ्यांच्या समस्या, दुःख चित्रीत करताना दिसतात. त्यामुळे पात्रांची फारशी आवश्यकता भासत नाही.

लेखक व कल्पना ही मुख्य व्यक्तिचित्रणे आहेत. तर इतर पात्रे गौण व्यक्तिचित्रणामध्ये येतात. नामदेव, विकास, मोहन ही वाड्यात सालाने कामाला राहणारी माणसे आहेत. भाना वाईंडर हा मोटार दुरूस्त करणारा आहे. बाळू, रमेश हे दोघे भाऊ शेतात अपार कष्ट करतात. गोपाल सरोदे, चिंतामण गुलाब हे लेखकाचे शिवारकरी आहेत. सोम्या, शाम्या ही मंडळी शेतात रोजाने जाणारी आहेत. गोकूळ हा केळीच्या बागेत व्यापाऱ्यांबरोबर केळीचे घड मोजायला येतो. बापू शेठ, भाऊसाहेब चिंतामण, रामफलक, हिरामन नाना, पुरूषो भंगाळे, जगन भंगाळे, पम्या, लिलाधर, विष्णू, चिंधामू, निळूकाका, रामकाका, रामा, नामदेव, चिंतामन नाना, रामा, माळी, रामा बारकरी ही मंडळी कादंबरीमध्ये गौण व्यक्तिचित्रणामध्ये येतात.

स्त्री पात्रे कादंबरीमध्ये फारशी वावरताना दिसत नाही. कल्पना ही लेखकांची पत्नी आहे हे एकच मुख्य स्त्रीपात्र या कादंबरीमध्ये वावरताना दिसते. जिजी, सुमी, बारी ही स्त्रीपात्रे कादंबरीमध्ये क्वचितच कुठेतरी आढळतात. जिजी, सुमी शेतात रोजाने जाणाऱ्या स्त्रिया आहेत.

कादंबरीमध्ये लेखकानी व्यक्तिचित्रणावर जास्त भर दिला नाही. तर शेतकरी समस्यांचे जसेच्या तसे वास्तव चित्रण चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकांनी कादंबरीचे

कथानक पात्रांच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न न करता शेतकरी समस्यांची वास्तवता मांडण्याचा प्रयत्न वेळोवेळी केला आहे.

**लेखक :-**

लेखक हे डांभूर्णी, ता. यावल या गावचे आहेत. ते सुशिक्षित आहेत. तरीही ते शेती व्यवसायच करतात. डांभूर्णी गावातील सधन घरातील ते आहेत. त्यांच्या पत्नीचे नाव कल्पना आहे. त्यांना एक मुलगी व दोन मुले आहेत. मुलीचे लग्न झाले आहे. एक मुलगा डॉक्टर आहे. तर दुसरा इंजिनियरिंगच्या पहिल्या वर्षात नापास झाला. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास कमी होऊन तो मळ्यात फेऱ्या मारू लागला त्यामुळे लेखक खूप काळजीत होते. कारण लहान मुलगा जर शाळा सोडून शेतीच्या मागे लागला तर आपल्यासारखेच वाईट दिवस त्याच्या वाट्याला येतील. म्हणून लेखक सतत त्याची काळजी करत.

दिवाकर चौधरी यांनी जेव्हा 'बुझ्र्वागमन' या कादंबरीचे लिखाण पूर्ण केले तेव्हा ते फैजपूर साखर कारखान्याचे संचालक होते. ते ग्रामीण समाजातील प्रामुख्याने शेतकरी जीवनाचा वेध घेणारे लेखक आहेत. 'बुझ्र्वागमन' या कादंबरीतील हे प्रमुख पात्र आहे. आजचे त्यांचे श्रेष्ठत्व आणि स्थान मात्र त्यांना सहजासहजी प्राप्त झालेले नाही. लेखकांच्या वाडवडिलांच्या काळात गावात त्यांचा मोठा मान होता. परंतु लेखकांच्या काळात तसे काही राहिले नाही. कोणाची कोणाला किंमत नाही. जो–तो आपल्याच मनाचा मालक.

'बुझ्र्वागमन' ही शेती समस्येवरची कादंबरी आहे. त्यातील निवेदक हे लेखक आहेत. ते स्वतः शेतकरी आहेत. १९६८ पासून ते १९९९७–९८ पर्यंत लेखक ही शेती करत होते. त्यांच्या जवळ जिरायत–बागायत मिळून ५० एकर जमीन होती. ३० वर्षात कितीतरी हंगाम आले नि गेले. पण शेतीसाठी पीकासाठी काढलेले कर्ज उत्पन्नातून कधीच फिटले नाही. कधी उत्पन्नाने, कधी व्यापाऱ्यांनी, तर कधी निसर्गाने दगा दिला. असे गेली ३० वर्ष चालू होते. अशी परिस्थिती लेखकांच्याही वाट्याला होती. कर्जाच डोंगर त्यांच्यावरही वाढत होता. मात्र तो फेडण्याचा मार्ग काही दिसत नव्हता. परंतु लेखकांकडे ५० एकर जमीन होती. त्यातून काळजाचा तुकडा तोडावा

तसा लेखक तो जमीनीचा तुकडा तोडायचे आणि विकून मानेचा आवळलेला फास बाजूला करायचे म्हणूनच लेखकांवर इतर शेतकऱ्यांसारखी आत्महत्या करण्याची वेळ आली नाही.

लेखक हे स्वतः शेतकरी असल्यामुळे त्यांनी शेतकरी बांधवांच्या ज्या समस्या, अनुभव, दुःख, शद्बबद्ध केले आहे ते अतिशय समर्पक आहे. लेखकांच्या घरी वर्षभर कामासाठी नामदेव, विकास हे चाकरीला राहिले होते. ते वेळच्या वेळी कामावर येत नसत. कधी कधी तर न सांगताच सुट्टी घेत तेव्हा याचा लेखकांना खूप राग येई. पण पर्याय नव्हता. 'अडला नारायण गाढवाचे पाय धरी' अशी लेखकांची अवस्था झाली होती. त्यांना फार तोडूनही बोलता येत नव्हते. कारण काही रागाच्या भरात बोललो आणि निघून गेले तर. पैसे पण बुडले आणि वाड्यातली सगळी कामं लेखकांनाच करायला लागणार. त्यामुळे लेखकांच्या मनात नसताना देखील ते नामदेव, विकास बरोबर प्रेमाने वागतात. लेखकांच्या मते या गड्यांनी सकाळी लवकर उठून वाड्यातली काम उरकून रानात गेले पाहिजे. गडी मात्र तसे वागत नाहीत ते आपल्याच तालाने वागतात. लेखक म्हणतात, ''शेतातील धान्य महाग झाल्यावर जे लोक दंगा करतात. त्यांना सर्व शेतकरी लोकांनी एकमताने विरोध केला पाहिजे. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली पाहिजे. पंजाब, केरळ मधील शेतकऱ्यांसारखी संघटना केली पाहिजे.''[२]

लेखकांना वाड्यात काम करणारा विकास प्रामाणिक, चांगला मुलगा वाटतो. कारण तो वाड्यातील सर्व कामं उरकतो. कामचुकारपणा करत नाही. वयाने कमी असणारी मुलचं प्रामाणिकपणे काम करतात. एकदा का त्यांना मिशा फुटल्या की ती बदलतात. असे लेखकांना या लहान कामगारांविषयी वाटते. लेखक सांगतात आम्ही शाळा शिकलो, लाडात वाढलो त्यामुळे आम्ही नोकरी केली नाही. शेतीत कधी पाऊलच ठेवले नाही. त्यामुळे आमची 'इकडे आड, तिकडे विहिर' अशी अवस्था झाली आहे. गावागावात शाळा निघाल्या आहेत. प्रत्येक शेतकऱ्यांनी आपली मुल शिकवली पाहिजेत. नाहीतर त्यांची वाईट अवस्था होईल. धड नोकरीही नाही, आणि रानातही काम करायला जमत नाही. त्यापेक्षा सर्वांनी आपल्या मुलांना शिक्षण आणि शेती दोन्ही गोष्टीचे ज्ञान द्या असा संदेश लेखक आपल्या शेतकरी बांधवाना देतात. आपल्या वाट्याला आलेले दुःख इतरांच्या पदरी पडू नये असे लेखकांचे कळकळीचे सांगणे आहे. शेतीसाठी

लागणारे साहित्य कोण ना कोण कामासाठी म्हणून नेत असते. आणि आठवणीने मात्र आणून देत नाहीत. बाकीच्या व्यापातून हे मालकाच्या लक्षात रहात नाही. ते सामान नेमके कोणाला दिले आहे म्हणून लेखक म्हणतात, ''शेतीचे सामान नीट ठेवनं बी एक कला आहे. ते प्रचंड काम आहे. खरा किसान तोच. कसा टिप्पणबाज पाहिजे माणूस.''[३]

लेखकाच्या मते शेतकरी गहू पेरतो, परंतु त्याला चपाती खायला परवडत नाही. तांदूळ पिकवतो; पण भात खायला त्याला परवडत नाही. अशी परिस्थिती शेतकऱ्यांच्या वाट्याला आली आहे. लेखकांनी एकदा ज्वारी राखायला; एका म्हाताऱ्याला ठेवले. तर त्याने ज्वारी नीट राखली नाही. त्यामुळे बरीच ज्वारी पाखरांनी खाल्ली. लेखकांनी त्याला विचारले उलट तोच राखणदार लेखनांबरोबर दमात बोलू लागला. राखणीचे माझे मला पैसे द्या नाहीतर ज्वारी घाला. नाही म्हणावे तर गावभर बोभाटा असं पदोपदी लाचारीचं जिणं शेतकऱ्यांच्या वाट्याला येतं. आर्थिक बाजू तर राहू द्या पण राजकीय सामाजिक सर्व क्षेत्रात कोणतच समाधान नाही.

लेखकांच्या मते, ''ढोराई शिवाय, कुढी किसान शोभतो का?'' शेतकऱ्याकडे एक तरी जनावर असलंच पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांना दूध तर मिळतेच आणि शेतीसाठी खतही मिळते. लेखक कर्जाच्या ओझ्याखाली दबले होते. त्याना खूप टेन्शन होतं. त्यामुळे दुसरी कोणतीच गोष्ट त्याना सुचत नव्हती. येणारं उत्पन्न जर कर्जापेक्षा जास्त असेल, कर्ज फिटाण्यासारखे असेल तर बरं, नाही तर बिलकूल उत्साह समाधान वाटत नाही. एखाद्या कारणानं जमीन विकली तर गोष्ट वेगळी. कर्जासाठी जमीन विकणं म्हणजे आपली लायकी नाही अस समजावं.

शेतकऱ्यांनवर येणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांनी संघटना केली पाहिजे असे लेखकांना वाटते म्हणून ते म्हणतात – ''किसनाईची एक लॉबी तयार करा, अन् जो इकात अशीन त्याले आर्थिक मदत करा, फार तं त्याची चाचणी घ्या. चुकत अशीन त तसं सांगा भडव्याही हो.''[४]

लेखकांना 'केळी' हे राष्ट्रीय फळ मानले पाहिजे असे वाटते. कारण ते सर्वात स्वस्त मिळते आणि त्यात कॅलरीज जास्त आहेत. कोणी गैरविश्वास दाखविलेला लेखकांना अजिबात आवडत नाही. त्यासाठी ते कधीही आकडा थोडा वाढवून सांगतात. म्हणजे, ''एकत मी पाहिलेज अशीन त्याच्याहून वावर म्हना का काही म्हणा जास्त सांगतो म्हणजे हा बाग आता खरं पाहलंत

पावणे सहा हजाराहून जास्त नही, पणं नको, सहा हजार तसंच वावराचंबी चार बिघे असलं त साडे चार सांगतो. उगीच शंका कश्याले. आपन चार सांगावं अन ते ४। बिघे निघवं. मग अख्या गावभर त ते सरचं वावर सव्वा चार बिघे होत अन् त्याहीनं ते चार बिघे सागलं. उगच इज्जतचा पंचनामा नको.''[५]

लेखकांनी विवेचन केलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या सर्वसामान्य माणसाच्या हृदयाला पीळ पाडणाऱ्या आहेत. शेतकऱ्यांचे आयुष्य म्हणजे त्यांच्या वाट्याला आलेले दु:ख, कष्ट सोसण्यापलिकडे आहे. ते आपल्यासारखा सर्व सामान्य माणूस सहन करू शकणार नाही. लेखकांनी कादंबरीमध्ये स्वत:विषयी काही न सांगता शेती करताना त्यांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले त्या अडचणी त्यांनी कशा दूर केल्या याचे विवेचन अतिशय समर्पकपणे केले आहे.

**कल्पना :-**

कल्पना ही लेखकांची पत्नी आहे. लेखकांच्या घराण्याला पूर्वीपासून प्रतिष्ठा, नावलौकिक होता. त्यामुळे घरातील स्त्रिया घराबाहेर पडत नसत. गोशापद्धत होती म्हणून कल्पना वाड्यातीलच कामे करत असे. दिवसभर ती एकटीच घरी असे. वाड्यात ती एकटीच स्त्री असल्यामुळे वाड्यात तिचा एकटीचाच कारभार चाले. लेखकांच्या आई नंतर सर्व कारभार कल्पनाच्याच हातात आला होता. घरातील कामे बघत-बघत ती वाड्यात असणाऱ्या गुरांवरतीही लक्ष देत असे.

लेखकांनी एकदा एक म्हैस विकली तेव्हा तिच्या शेजारी असणारी दुसरी म्हैस हंबरत होती. हे ऐकून कल्पनाचा जीव एकदम कासावीस झाला. दुसरी म्हैस विकली तेव्हा कल्पनाच्या डोळ्यात पाणी आले तेव्हा कल्पना म्हणते, ''याहींच न आपलं सगळ्याइंच मीसन एक कुटुंब आहे.''[६]

कल्पनाचा वाड्यातील जनावरांवरती खुप जीव होता. कारण दिवसभर गडी रानातली कामे करण्यासाठी जात तेव्हा कल्पनाच त्या जनावरांना मूठ-मूठ खायला घालत असे. घरातील लोकांची ज्या प्रमाणे कल्पना काळजी घेत असे त्याचप्रमाणे जनावरांचीही घेत असे.

BHARATI MAHAVIDYALAYA ... 

कल्पनाने म्हैस व्यापाऱ्याला न विकता शेतकरी कुटुंबातच विकली. कारण शेतकरी कुटुंबात तिची काळजी घेतली जाते. व्यापाऱ्यांना दया माया नसते. त्यांचा रोजचाच व्यवसाय असतो.

आठवड्याच्या बाजारदिवशी मजुरीच्या बायकांचा हिशोब भागविण्याचे कामही कल्पनाकडे होते. कारण मजुरीच्या बायकांबरोबर तुझं माझं करण्याचे लेखकांना जमत नव्हतं. असे प्रत्येक वेळी कल्पना आपल्या पतीला मदत करत असे, सावरून नेत असे म्हणून या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''घरची लक्ष्मी अशीच कायजी घेते किसानाची शपथ भो.''[७]

कल्पनाही प्रत्येक सुख–दुःखाच्या वेळी आपल्या पतीला म्हणजे लेखकांना साथ देणारी, मुक्या प्राण्यांवरती प्रेम करणारी कष्टाळू स्त्री आहे.

**भाना वाईंडर –**

भाना हा मोटारी दुरूस्त करणारा मॅकेनिक आहे. भाना हा वाईंडर तर आहेच पण शेतकरीही आहे. शेती बरोबर तो वाईंडींगचे काम करतो. भानाला शेतकरी जेव्हा बोलवायला येतील तेव्हा लगेच हातातले काम सोडून त्यांच्या मदतीला जातो. वेळोवेळी शेतकऱ्यांना आपली वाईंडरकी दाखवत नाही. म्हणजे शिष्टपणे वागत नाही. समोरच्या शेतकऱ्यांची अडचण तो समजून घेतो. आणि आहे त्या परिस्थितीला तोंड देऊन जेवढे साहित्य आहे, तेवढ्यात मिळते जुळते घेतो. आणि शेतकऱ्याची मोटर दुरूस्त करून देतो. वेळोवेळी कामाच्या पैशाला उधार रहातो. एखाद्या वेळेस मोटर जळली असेल तर जेवढी लागते तेवढीच वायर आणतो. इतर वाईंडरसारखे जास्त वायर सांगून कमी आणायची आणि पुन्हा हलक्या प्रतीची वायर वापरायची. भाना अशी फसवणूक कधी कोणत्या शेतकऱ्यांची करत नाही.

गावात तसे दुसरेही वाईडर आहेत. परंतु लेखकांचा विश्वास फक्त भानावरच आहे. म्हणून ते म्हणतात, ''ज्याह्या त्याह्या भरोशाचा प्रश्न आहे. कोन्हाचा कोन्हावऱ्हे भरोसा आहे त कोन्हाचा कोन्हावंऱ्हे अन् एकच वाईंडर पकडला की कव्हामव्हा कामाचे पैशे उधारबी ठेवता येता.''[८] म्हणून लेखक मोटर बिघडली की, फक्त भानालाच बोलवतात. अशा पद्धतीने तो स्वतःही एक शेतकरी असल्यामुळे आपल्या शेतकरी बांधवांचे दुःख समजवून घेऊन त्यांना


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मदत करतो. या कादंबरीमध्ये प्रेमळ, परोपकारी हुशार, प्रामाणिक असा गुणसंपन्न भाना वाईंडर पहायला मिळतो.

**बाप्पा :–**

बाप्पा म्हणजे लेखक दिवाकर चौधरी यांचे वडिल श्रावण चौधरी आहेत. त्यांचे सर्व शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले होते. ते वकिल होते. गावातील पहिले ग्रॅज्युएट होते. त्यांना सर्व लोक भाऊसाहेब म्हणत. बाप्पांचा पोशाख खादीचा शर्ट आणि धोतर असा होता. अकरा वर्ष त्यांनी यावल मध्ये वकिली गाजवलेली. बाप्पा गावातील एखाद्या जरी माणसाला हाका मारेपर्यंत सगळे लोक लगेच गोळा होत. सगळे लोक त्यांना घाबरत असत.

एकदा सुभाषबाबूंना होस्टेलमध्ये यायला निमंत्रण दिले होते. तेव्हा सुभाषबाबूंना त्यांनी प्रश्न विचारले होते. बाप्पा खूप हुशार आणि धाडसी होते. त्याकाळात ते खूप शिकलेले होते. त्यांना कोणताही गर्व नव्हता. गावातील लोक त्यांच्याशी आदराने वागत. गावातील पहिला मळा खरेदी करणारेही तेच होते. त्या मळ्याला भूरीचा मळा म्हणून लोक ओळखत. गावात कोणालाही विचारले की भुरी कोणाची तर लगेच लोक सांगत भूरी बाप्पाची. माळरान जमीनही त्यांनी साफ केली. भूरीत त्यांनी लिंबू, संत्री, मोसंबी, जांब लावले होते. विहिर खोदायला तर त्यांनी ह्यात घालवली. दरवर्षी विहिर खांदायचे पण पाणी कांही लागल नाही. वर्षानुवर्षे तोच कार्यक्रम विहीर खोदायची आणि जमीन लेव्हल करायची. बिना कामाची जमीन रासवर आणली.

गावात पहिले मशीन जर्मन ड्यूज पण त्यांनीच आणलं. कोणताही नवखा माणूस मशीन पाहे आणि आश्चर्य करे. मशीनचा पट्टा सरकला तर बुटासकट विहिरीत उतरत, स्वतः पट्टा मशिनवर चढवत जराही घाबरत नसत.

यावलला वकील होते. तेव्हा वकिली अन् तिथून परत डांभूर्णीला आल्यावर शेतकरी, म्हणजे पूर्ण शेतकरी त्यांना स्वतःची ४० एकर जमीन होती. टांगा जूंपला की निघाले मळ्यात. मग अख्खा गाव म्हणायचं, चालला बाप्पाचा टांगा भूरीत. मशीन बिघडलं असेल तर, दुरूस्त केल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. मशीनचा प्रत्येक भाग त्यांना माहित झाला होता.

बाप्पाच्या काळात वाड्यात सुखसमृद्धी होती. यासंदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''बाप्पाच्या टाईमाले वाड्यातलं घर कंस भरले राही. खिया ना मांगना पडे. सामानच् सामान. पाहिजे ते अन तसं. जढली वस्तू तढी ठेयाची. म्हणजे कसं त वखर तवंगावऱ्हे न्हणजे तवंगावऱ्हे. जागा बदलली की बाप्पाची मानसाईवऱ्हे कडकी हे आपले उलट उत्तर देतीनचा धाक बाहदराच्या मनात होताच नही. कोन्हाची माय जननार नही उलट बोल्याची.''[९]

बाप्पाचा राग क्षणाचा होता. रागवलं की लगेच शांत. काही घडलं अस कोणालाच वाटणार नाही. ओठावर काय आणि पोटात काय असं होत नाही. बाप्पा मायाळूही तितकेच. तसे खूप काळजी करायचे. कोण आजारी पडो कोणाला कोणतीही अडचण असो. लगेच बाप्पा मदत करत. आपल्या कुटुंबातील सदस्यासारखे वागवत. परंतु हिशेब म्हणजे हिशेब. तसे प्रामाणिक होते. त्यामुळे गावातील गोरगरीब लोक बाप्पांजवळ पैसे ठेवायला आणून देत. जेव्हा काम पडेल तेव्हा नेऊ असे सांगत. बाप्पा स्वतःच्या घरी कितीही गरज पडो लोकांच्या रकमांना हात लावत नसत. रकमा कपाटात जशाच्या तशा. अर्ध्या रात्री का कोणी मागायला येईना, त्यांची बँकेमध्ये जेवढी रक्कम सुरक्षित राहणार नाही, तेवढी बाप्पांजवळ राहणार असे लोक म्हणत. बाप्पा खूप दिलदार मनाचे होते. बाप्पा हिशोबाला एकदम पक्के होते. दोन आणे दोन अधेल्यापासून हिशोब ठेवत असत. मजुरीचे पाच वर्षाचे पण हिशोब विचारा. बाप्पा बरोबर नेमकी वही काढून हिशोब बरोबर समजावून सांगत. म्हणजे कोणता माणूस केव्हा आला किती पैसे आगाऊ दिले व ते सगळी व्यवस्थित बरोबर सांगायचे. कारणासहित सर्व हिशोब लिहत असत. दिवाकर चौधरी बाप्पांच्या संदर्भात म्हणतात, ''कर्मयोगी आहे तो आमच्या घरातला आजबी बाप्पा आहे. तो ८७ वर्षाचा आहे. घरात लाकडी पलंगावऱ्हे बशी रहातो. आधार घेत थरथर कापत पाच सात पावल चालतो. कहीन महीन संतापला त म्हणतो. मी चाळीस एकराचा मालक अन् मले काही इचारता नही.''[१०] वय झाले तरी काम करण्याची बाप्पांची जिद्द उत्साह काही कमी झाला न्व्हता. हाच आजची पिढी व पूर्वीची पिढी यातील फरक होता.

बाप्पा ८७ वर्षाचे झाले तरी, उत्साहाने टांगा जुंपून जात. शेवटी लेखकांनीच त्यांना घरी

बसवले. बाप्पाचा गावात दरारा होता. लोक त्याना आदराने वागवत. जिद्दी, कष्टकरी, प्रामाणिक असे बाप्पांचे आगळे वेगळे व्यक्तिमत्व आपल्याला कादंबरीमध्ये पहायला मिळते.

**लेखकांची आई –**

लेखकांच्या आई खुप हुशार होत्या. त्यांची स्मरणशक्ती एकदम तीव्र होती. कोणतीही गोष्ट त्याबरोबर कारणासहित आठवण करून देत. त्या काळातील त्या सहावी शिकलेल्या होत्या. वर्गात पहिल्या यायच्या. त्यांचा निबंध सगळ्या शाळेत वाचून दाखविला जाई. शाळेतून नाव काढायला हेडमास्तरांचा विरोध होता. पण लग्न झाल्यामुळे सगळ्यांचा इलाज खुंटला.

शेतीतील असमाधानकारक उत्पन्नामुळे त्यांना खुप दुःख सहन करावे लागले. तरीही त्यांचे त्या धरतीमातेवर खूप प्रेम होते. बाप्पांच्या काळात घरातील सर्व कारभार त्याच पहात. त्यांना कॅन्सर झाला तेव्हा दवाखान्यात अॅडमिट केले होते. तेव्हा त्याना कळाले होते की, आपण यातून वाचणार नाही. म्हणून त्या सर्वांना म्हणत, ''भाऊ मले घरी मरनं आहे आढी नाही''[११] एवढे प्रेम ऋणानुबंध त्या वाड्याशी लेखकांच्या आईचे जुळले होते. त्यामुळे आपले काहीही होऊ ते वाड्यातच व्हावे असे त्यांचे मत होते. त्यांचा मृत्यू कॅन्सरने झाला होता. कॅन्सरने त्यांच्या अंगाची लाही लाही होई. तरी ही या आजारने होणाऱ्या असह्य वेदना तिने कोणालाही त्रास न देता सहन केल्या होत्या. एवढी सहनशीलता पाहून सर्वांनाच त्याचे आश्चर्य वाटे. लेखकांच्या घरात कसलेच सूख मिळाले नाही.

शेवटचे त्यांचे बोल मात्र कायमचे सर्वांच्या लक्षात राहीले. लेखकांच्या चुलत बहिणीला त्या नेहमी सांगायच्या, ''दूध खाव्वा, तूप खाव्वा, कशाले चिंता करवा''.[१२] हे ऐकल्यावर लेखकांना वाटेल की, जणू काही आपल्या आईच्या या इच्छा अपुऱ्या तर राहील्या नसतील ना? सर्वांना खायला घालता घालता तिने स्वतःकडे कधी लक्ष दिले नाही. अशा प्रेमळ, सुस्वभावी, परोपकारी, निर्गवी स्वभावाच्या आई लेखकांना लाभल्या.

**विकास :-**

विकास हा लेखकांच्याकडे सालगडी म्हणून राहिलेला. विकास वागायला खुप चांगला मुलगा होता. वाड्यातील सर्व कामे तो उरकत असे. तो १५-१६ वर्षाचा होता. त्याचे वय खूप कमी होते. काम करायचे त्याचे वय नव्हते. परंतु परिस्थितीने त्याच्या नशिबी हे काम आले होते. तो चांगल्या घरातील मुलगा होता. पण घरची खुप गरिबी होती. वाड्यातील सर्व कामे तो प्रामाणिकपणे करत असे. त्यामुळे लेखकांना विकास विषयी प्रेम होते, दया होती. लहान कामगारांच्या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''काही काही लहाने ढोरकी बरे रहाता. त्याहिनले अजून मिशा फुटेल रहाता नही. जव्हा मिशा फुटता तव्हा ते भी बदली जाता.''[१३] म्हणजे विकास लहान आहे. त्याला अजून कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य नाही.

इतर सालगड्यांच्यात व लेखकांच्यात जे मतभेद होते, तसे मतभेद विकास व लेखक यांच्यात नव्हते. कारण विकास वयाने लहान होता. आणि तो कधी कामचुकारपणा करत नसे म्हणून लेखकाचे त्याच्यावरती खूप प्रेम होते. वाड्यातील गुरांवरही त्याची खूप माया होती. वाड्यातली मोठी म्हैस विकली हे कळल्यावर त्याचा चेहरा पूर्ण उतरला होता. गरीब, प्रामाणिक, लहान असून आपली कामे जबाबदारीने करणारा सालगडी होता.

**नामदेव :-**

नामदेव हा लेखकांकडे सालगडी म्हणून राहिलेला वाड्यातील, शेतातील कोणतीही पडलेली कामे करण्यासाठी त्याला ठेवलेले. परंतु तो चलाख होता. नेहमी कामचुकारपणा करत असे. कोणतेही काम तो हुशारीने करे. मालकांना त्याची गरज आहे हे त्याच्या बरोबर लक्षात आले होते. वर्षाच्या कामाची रक्कमेची ठरविल्यापेक्षा जास्त उचल केली होती. लेखकांची पत्नी कल्पना असे म्हणाली तर नामा म्हणतो, ''तुम्ही काही फिकीर करू नका. आखजीलेत लागाईनच की नी. नही बी लागल त् जढी लागीन तढून लागतार बरोबर तुमचा हिशेब दी दीन. मंग त झालं? का विश्वास नही माह्यावऱ्हे.''[१४] असा उलटा प्रश्न नामाच मालकीणीला विचारतो. यावर कोणीच

उत्तर देऊ शकत नव्हते. कारण लेखकांचा याला नाइलाज होता. काय म्हणावे तर काम सोडून जाईल. त्याला काय हे नाही ते घर. बरेजण त्याला कामाला ठेवायला तयार आहेत. मालकानां मात्र तसे करता येत नाही कारण दुसरा गडी मिळेपर्यंत ही सर्व कामे तो एकटा करू शकत नाही.

एखाद्या वेळीस विकास वाड्यावरती कामाला उशिरा आला तर नामाला खूप राग येत असे. कारण तो येईपर्यंत वाड्यातली सर्व कामे त्याला एकट्याला करावी लागत. नामदेव वयाने लहान असलेल्या विकासला बरोबर कामाला लावे. विकासला यातले काहीच कळत नसे. तो बिचारा काम करत राही. लेखकांनी नामदेवला स्वतःवरती किती कर्ज आहे हे सविस्तर सांगितले होते. कारण त्यामुळे तरी नामदेव कामाला लागेल सुगी चांगली येईल. पण नामदेवने घ्यावी तेवढी ही गोष्ट मनावर घेतली नाही. या कानाने ऐकली त्या कानाने सोडून दिली. मालकाचे तिकडे काहि का होईना.

लेखकांच्याकडे पैशाची टंचाई असताना देखील नामदेव आपला पगार बरोबर काढून घेत असे. उलट नामदेवकडेच लेखकांची पैशाची उचल झाली होती. असा हा नामदेव हुशार, चलाख, कामचुकार गडी म्हणून कादंबरीत वावरताना दिसतो.

अशाप्रकारे कादंबरीमध्ये मोजकीच पात्रे आपल्या रूपगुण वैशिष्ट्यांसह वावरताना दिसतात. दिवाकर चौधरींनी कादंबरीचे कथानक लिहताना पात्रांना म्हणावे इतके महत्त्व दिले नाही. कामापुरताच पात्रांचा वापर केलेला आहे. कथानकाला पात्रांच्या संवादातून, प्रसंगातून, गतिमान न करता स्वतःचे, शेतकऱ्यांचे अनुभव मांडून कथानक पुढे नेले आहे. पात्रांच्या कमी वापरामुळे कादंबरीला कोठेही बाधा आलेली नाही उलट अतिशय प्रभावीपणे परखड, शद्बात शेतकरीबांधवाच्या समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### ३. भाषाशैली :–

'बुझ्र्वागमन' या ग्रामीण कादंबरीमध्ये दिवाकर चौधरींनी शेतकरी जीवनाच्या वास्तवतेचे दाहक वर्णन शद्बबद्ध केले आहे. लेखकांनी कादंबरीमध्ये लेवागण बोलीचा वापर केला आहे. याचे

प्रत्ययाला येते. शेतकऱ्यांविषयी विचार करायला लावण्याची ताकद, सामर्थ्य दिवाकर चौधरी यांच्या लेखणीत आहे.

लेखकांनी वापरलेल्या लेवागण बोलीला कोणत्याही गोष्टीचा साज चढवलेला नाही. साध्या सोप्या भाषेत मांडणी झालेली आहे. त्यांच्या लेखनामध्ये असलेल्या म्हणी, वाक्यप्रचार, उपमा, अन्य भाषेतील शद्व यांच्यामुळे कादंबरीतील भाषाशैली ग्रामीण साहित्यकृतीत सरस वाटते. लेवागण बोलीमध्ये लेखकांना अतिशय वास्तव, परखड, भाषेत शेतकरी जीवनाचा पट शद्वबद्ध केला आहे.

लेवागण बोली मध्ये ला ऐवजी ले, (कऱ्याले, मले) ह्ये ऐवजी भो (ओभो) ळ ऐवजी य (काळजी–कायजी, पावसाळा–पावसायच्या) झ ऐवजी ह (माझी–माही) नको ऐवजी ना (नही) काबर ऐवजी काभ्र, वरती ऐवजी वऱ्हे, मिळतो–मिता, नाही–नही इत्यादी शद्वांच्यातील बदल या बोली भाषेमध्ये आढळतात.

उदा. – ''बागाईतदार शेतकऱ्याइनले निदान ऊस बाग तरी लावता येतो. जंगल हिरवा तरी राहतो. त्याच्यानं गवत, केळीचे पिलं, उसाचे वाढे तरी मिता ढोराईले. हिरवी पत्ती पाहीसन सावकार म्हणा, ग्रुपवाला म्हणा टाईम पडला तर ॲडव्हांस पैशे तरी देतो. कोल्डान वात्याले त जिवारी पेरनीच पडते.''[१६] पाणी असलेला शेतकरी सुखी असतो, परंतु ज्यांच्याकडे पाणी नसते त्याना फक्त कोरडवाहूच पीके घ्यावी लागतात.

''नुसता किटतो रे जीव. आकडेवारी तुम्हाले गैऱ्ही दिसते. पन जादुगारानं मायावी पेढा हातावर ठेव्वा तशी आहे ते राती होत्या गैऱ्हया गायी पहाटे उठी काही नही.''[१७] शेतकऱ्यांच्याकडे शेतीचे वर्षातून एकदाच पैसे येतात परंतु ते भरपूर असतात. त्यामुळे लोकांना खुप दिसतात. पण त्या पैशाची वाटणी आधीच झालेली असते. त्यामुळे पैसे आलेले दिसतात, परंतु ते कोठे गेले याची शेतकऱ्यांना दाद लागत नाही. पुन्हा जैसे थे.

अशाप्रकारे दिवाकर चौधरींनी कादंबरीमध्ये लेवागण बोलीचा वापर करून विदर्भातल्या शेतकऱ्यांच्या व्यथा त्यांच्याच शद्वात मांडल्या आहेत.

कारण 'लेवा पाटीदार समाज व शेती व्यवसाय' हे एक समीकरण आहे. एवढे या समाजाचे शेतीवर प्रेम आहे. परिसरातील तीन–चार तालुक्यातच ही बोलली जाते. परंतु याचा अर्थ भुसावळ, यावल, रावेर, सावजा, फैजपूर, जळगाव या तीन चार तालुक्याचीच ही कथा आहे. असं नाही तर देशातल्या ''उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत अन् पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत शेतकऱ्यांच्या सार्वत्रिक दैन्यावस्थेचे चित्रण आहे''[१५] समाजातील शेतकऱ्यांच्या दुःखांना वाचा फोडण्यासाठी, त्यांचे दुःख लोकांपुढे मांडण्यासाठी आवश्यक असे भाषासामर्थ्य लेखकांजवळ आहे. 'लेवा बोली' ही 'अहिराणीची' एक उपबोली आहे. जळगाव जिल्ह्याचा पूर्वभाग त्यातील जळगाव, यावल, फैजपूर, रावेर, सावदा, भुसावळ थोडासा विर्दभाचा भाग व या भागातील लेवा पाटीदार समाज या बोलीचा प्रामुख्याने वापर करतो. बराच काळ अज्ञानामुळे या बोलीला अहिराणी बोली असे संबोधले जायचे, परंतु ही अहिराणी बोली नव्हे.

सुप्रसिद्ध कवियत्री बहिणाबाई चौधरी, सोपानदेव चौधरी, भालचंद्र नेमाडे, वि. भा. नेमाडे तथा दिवाकर चौधरी याच लेवा पाटीदार समाजातून कवी व लेखक म्हणून उदयाला आले. त्यापैकी बहिणाबाईची संपूर्ण कविता व दिवाकर चौधरी यांची 'बुझ्र्वागमन' ही कादंबरी याच बोलीतून लिहली गेली आहे. त्यांच्या कादंबरीचे अध्ययन करताना याच बोलीचा वापर का केला? याचे दिवाकर चौधरींनी दिलेले उत्तर असे की, ''ज्या मातीशी इथला शेतकरी रक्ताच्या नात्याने बांधला गेलेला आहे. त्याचा आयुष्यभराचा व्यवहार ज्या बोलीत चालतो त्याच बोलीचा वापर करणे मला गरजेचे होते.'' त्याप्रमाणे या बोली भाषेचा वापर केला आहे.

'लेवागण' बोली भाषेचा वापर केल्यामुळे या कादंबरीला ग्रामीणतेचे एक मूल्य प्राप्त झालेले आहे. या कादंबरीतील ही भाषा बोलणारी पात्रे रूपगुणाच्या वैशिष्ट्यांसह उभी राहताना दिसतात. संपूर्ण कादंबरी वाचताना वाचकांच्या मनात एक प्रकारचा शेतकरी जीवनाचा दुःखपट उभा राहतो. एक वाचक म्हणून किंवा अभ्यासक म्हणून कादंबरी वाचताना शेतकऱ्यांच्या वाट्याला येणाऱ्या समस्यांचे दर्शन घडते. इतराना शेतकरी हा सुखी वाटतो. कारण त्याच्याकडे भरपूर धान्य असते. भाजीपाला असतो. दूधदुभत्यासाठी जनावरे असतात. त्यामुळे तो सुखी आहे असे वाटते, परंतु हा सर्व कारभार सांभाळताना त्यांना किती समस्यांना तोंड द्यावे लागते. हे कादंबरी वाचल्यानंतर

संवाद –

'बुझ्वर्गमन' या कादंबरीमध्ये डांभूर्णी, ता. यावल या गावचा परिसर आपल्या गुणवैशिष्ट्यांसह कमी–अधिक प्रमाणात साकार होताना दिसतो. म्हणून या कादंबरीतील शेतकरी बांधवांचा जीवनपट फक्त डांभुर्णी गावातीलच शेतकऱ्यांचाच नाही तर, देशातील सर्व शेतकरी बांधवांचा आहे. कारण या सर्व घटना प्रत्येक शेतकऱ्यांच्या वाट्याला येतातच. या कादंबरीतील पात्रे लेवागण बोलीतून बोलताना दिसतात. पात्रांचेच नव्हे तर कादंबरीचे निवेदन ही लेवागण बोलीतून आहे. कादंबरीतील संवाद हे वास्तव जीवनाचे वर्णन करताना दिसतात. कादंबरीमध्ये संवादाचा वापर अल्पप्रमाणात केला आहे.

शेतकरी जीवनामध्ये अनेक समस्या डोकावत असतात. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडतात. समाजामध्ये प्रगत तंत्रज्ञान निघाले आहे. परंतु ते भांडवलाअभावी शेतकऱ्यांना घ्यायला परवडत नाही. आधुनिक तंत्रज्ञानाने शेती सोपी, सोयीस्कर झाली आहे. परंतु ती खुप महाग आहे. त्यामुळे शेतकरी पाठीमागे राहिला आहे.

साधी मोटर बिघडली तरी शेतकऱ्यांच्या अंगावरती काटा उभा राहतो. मोटर दुरूस्त करणे सोपी गोष्ट आहे. परंतु ती दुरूस्त करण्यासाठी करावी लागणारी जमवा–जमव खुप अवघड असते.

''का आपली मोटर बयाली?''

''तुले कोन्हं सांगलं?''

''पकानं. वाड्यात चावयत होते तुम्ही.'' तिच्या चेहऱ्यावर चिंता दिसली.

''हुईननं! काभ्रं कायजी करती? बारे तपासनी आहे.''

''मानाले न चिंधाले पहाते नं?''

''हाओ, नामदेवले सागलं.''[१८]

मोटर बिघडणे हे प्रकरण खूप त्रासदायक असते. त्याची काळजी शेतकऱ्यांच्या घरच्यानांही असते. कारण मोटर दुरूस्त करेपर्यंत वेळ जातो. दुसरी मोटर जोडायला शेतकऱ्यांकडे शिल्लक नसते. त्यामुळे पीके वाळू लागतात. काहीवेळा तर मोटर काढायला विहिरीत उतरलेला

गडीच खाली पडून मरतो. त्यामुळे मोटर काढायला उतरलेला माणूस खालून वरती आल्याशिवाय शेतकरी चिंतामुक्त होत नाही अशा अनेक समस्या उभा राहतात. त्यामुळे मोटर बिघडली की शेतकरी त्याच्या घरची मंडळी चिंतेत पडतात.

समाजातील लोकांची वागण्याची अवस्था काय आहे याविषयीचे भाष्य पुढील संवादात केले आहे.

''पण बनेल आहे साले कोन्हीबी म्हणतो परवडत नही. मगं परवडत कोन्हाले या देशात.

नौकरदार म्हणतो –परवडत नाही!

अवढच काय बेपारी म्हणतो – परवडत नाही!

मग परवडतं कोन्हाले या देशात.

कोन्हाले परवडत का नही आम्हले काय माहीती आहे? झाटा पण आम्हले परवडत नाही! खोट बोलीन त्याच्या मायचे नवरे दोन!''[१९]

या संवादामधून प्रत्येकजण म्हणतो मला परवडत नाही, आम्हाला परवडत नाही, मग कोणाला परवडते. देशात प्रत्येकजण गरीबच आहे का? ऊसाला भाव मिळाला तर साखर स्वस्त पाहिजे, शेगांना भाव मिळाला तर इकडे तेल स्वस्त पाहिजे. अशी द्विधा अवस्था निर्माण झाली आहे. हे लोक लोखंड, सोने, टी. व्ही., फ्रिज यासारख्या वस्तू महागल्या तर कोणी काहीही बोलत नाही. साखर, तांदुळ, गहू महागले की लगेच महागले, महागले म्हणून दंगा करतात. म्हणजे समाज नक्की कोणाची कड घेत आहे.

लेखक मळ्यात फिरायला गेले तेव्हा, परत येताना रस्त्यात विष्णू भेटला. त्याच्याकडे पाहून हसला.

हसनं पडतं, मंग का रडतू?

काय सर म्हणीसन त्यानं इचारलं.

सगळी जिवारी चोकाई गेली, म्हणून त्याले सांगलं.

ते त् इचारू नका सर, आम्ही रोज पहात कव्हाबी येव्वा त म्हतारा जपेलच राहे.

अरे मंग तुनं साग्याले काय झाल्त?

काय सांगता सर? सांग्याले जाव्वा त्

कव्हा कव्हा अंगावऱ्हेचा गोट येते.

काय करता मंग? गुपचूप बसवा.[२०]

या संवादातून शेतकऱ्यांनी ज्वारी राखायला ठेवलेले मजुर किती प्रमाणिकपणे काम करतात हे स्पष्ट होते. तसेच शेतकरी बांधवानविषयी किती सहानुभूतीची भूमिका आहे नाही हे दिसते. शेतकऱ्यांचे काहीही होओ सर्व ज्वारी पाखरांनी खाल्ली तरी मजुरांचे काय जाते. त्यांचा पगार त्यांना मिळणारचं शेतकरी स्वतःही शेतात जाऊन पाखरे राखू शकत नाहीत कारण इतरही खुप कामे असतात. म्हणून मजुर ठेवलेले असतात तर ते अशा पद्धतीने वागतात. शेतकऱ्यांनी कोणा कोणाकडे लक्ष द्यायचे.

व्यापारी मंडळींनी तर शेतकऱ्याना पूरेपुर संकटात आणले आहे. कितीही शेतकऱ्यांनी उत्पादन काढू अगर न काढू शेतकऱ्याने माल बाजारात आणला की दर पडलेलाच असतो. थोड्याच दिवसात अथवा वेळेत त्या मालाचाच पुन्हा दर चढलेला असतो. यापाठीमागचे गुढ काय. तर हे व्यापारीच शेतकऱ्यांकडून माल कमी किमतीत घ्यायचा गोडाऊन मध्ये साठवून ठेवायचा मंदी आली म्हणून सर्वत्र ओरड करायची मग तो माल बाहेर काढून त्याचे पैसे दुप्पट करायचे अशा पद्धतीने व्यापारी मालामाल होतात आणि शेतकरी बिचारा मालाला दर नाही म्हणून आलेल्या संकटाला तोंड देत राहतो. यावर सरकाने शेती माला योग्य दर मिळावा, मध्यस्थ, दलाल यांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन केली. त्यामध्ये ही राजकारण शिरले. शेतकऱ्यांचा कैवार घेणारेच दलाली करू लागले.

भाऊ,

आवंदा बहुत संत्रा आया. आम बहुत आये.

ए बहिनझु, हे त् काहीच नही त्.

भाऊ,

उध्दर बहुत बेदाना आया.

आता कोन कितलेक बेदाने खात असतीन पण काहीन काही कारण दाखोयीसन मंदी दाख़ाडता गधडीचे. [२१]



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

किती लोक बेदाणे, संत्रे खात असतील? किती लोकांना या गोष्टी खायला परवडत असतील तरी देखील मंदी येते. या संवादातून व्यापाऱ्यांची व्यापार करण्याची पद्धत कशी आहे ते शेतकऱ्यांना कसे लुबाडतात याचा प्रत्यय येतो. अशा अनेक समस्यांमुळे शेतकऱ्यांच्यामध्ये कोणत्याच पीकांविषयी रस राहिला नाही. कोणतेही पीक घ्या काहीना काही उभे असतेच त्यापेक्षा त्या नादालाच लागायला नको असे शेतकऱ्यांना वाटू लागले आहे.

''त्याच्यानंच कोणत्याच पिकात इंटरेस्ट राहला नही आता. नही त पहिलेन नुसत कौतुक राह्यच, पाच हजार की आहे भो! अमुक अमुकनं त मिरची लावली भो. अमुक अमुकची त येहेर खंदाई रहाली भो! आतं त बिलकूल उत्साह राहला नही, की लाव, ऊस लाव, वाजा लाव का भेंड लाव, आम्हले बिलकूल कौतुक नही ओभो बिलकूल..... आयुष्याच्या उत्तरार्धात सांगतो गधडीच्या. मी तं चॅलेंज देतो.''[२२]

सगळीच पीके मातीमोल झालीत. कादंबरीमध्ये लेवागण बोली बरोबर हिंदी भाषेचाही वापर केला आहे. कादंबरीमधील कोणत्याही पात्राची भाषा हिंदी नाही. तर योगायोगाने सहजपणे कथानकाची मांडणी करताना ते हिंदी भाषेचा वापर करतात.

उदा. –

अन भैय्या उपासनी म्हणतो, ''किरकोळ हवालदारोसे बात नही करने का! शेर की गांड मारो और जंगलमे राज करो.''

''अहारे शेर गांड मारनेवाले हमारी मारो भाई लेकीन मोटार शुरू करो.''[२३]

या संवादातून काहीही करून मोटार दुरूस्त झाली पाहिजे असे लेखकांना वाटत असते. कारण मोटर बिघडल्यामुळे पीकांना पाणी मिळत नाही. पीके वाळतात म्हणून शेतकऱ्याला काळजी वाटते.

''किसान इतना सस्ता नही है भेंच्योद. सस्ती चिज नही मिलेगी नही मिलेगी! तुम्हाले बापका माल हैक्या भडव्याहीहो! हम समस्त किसान चाहेंगे वो भाव मे बेचेंगे. सावधान''[२४]

शेतकरी आपल्या मालाचा भाव ठरवून त्यांना हव्या त्या किंमतीत विकेल. असे लेखकांना वाटते. जे माल स्वस्त द्या म्हणतात त्यांच्याविरूद्ध लेखकांनी चीड व्यक्त केली आहे.

अशाप्रकारे या कादंबरीतील बोलीभाषेतील संवादामुळे शेतकरी समस्यांच्या वास्तवतेचे विदारक दर्शन घडतेच. लेवागण बोली सुरूवातीला वाचल्यानंतर समजण्यासाठी अवघड असली तरी समजून घेतल्यानंतर कादंबरीतील संवादातून शेतकऱ्यांच्या जीवनातील विविध समस्यांचा वृत्तांत जसाच्या तसा आपल्यासमोर उभे राहतो.

**प्रश्नार्थक शैली :-**

दिवाकर चौधरींनी 'बुझ्र्वागमन' कादंबरीमध्ये प्रश्नार्थक शैलीचा वापर केलेला आहे. प्रश्नार्थक शैलीमुळे जागोजागी प्रश्नांचा उलगडा करताना लेखकांच्या, पात्रांच्या मनातील विचार उलगडताना दिसतात. त्यांच्या विचारांना चालना मिळते. लेखकांनी जाणीवपूर्वक या शैलीचा वापर केलेला नाही. तर शेतकऱ्यांचे जीवन म्हणजे एक प्रश्न असतो. या शेतकरी जीवनाचा वेध घेताना हे प्रश्न आपोआपच, सहजतेने उभे राहिलेले आहेत. प्रश्नार्थक शैलीमुळे जे प्रश्न निर्माण झाले आहेत ते अतिशय वास्तव व समर्पक आहेत.

''याले कोन्हाले जबाबदार धरावं? सावकारले, सरकारले, मजुराईले, निसर्गाले तुम्हाले-कोन्हाले जबाबदार धरावं?''[२५] लेखकांनी समाजातील लोकांना विचारलेला प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीला यातील कोणाला जबाबदार धरावे यातून लेखकांची शेतकऱ्यांविषयीची तळमळ, प्रेम व्यक्त होते. यातील प्रत्येकजण शेतकऱ्यांच्या संकटांना थोडाफार का होईना कारणीभूत आहे.

कोन्हा कोन्हा जोय मानूस ठीन? का काटा तपासनारा जोय ठिन? का पांट्या लिहीणारा जोय ठीन? धड काट्यावऱ्हे लावणाराकडे लक्ष दीन? का कटर मांघे फिरीन?[२६] लेखकांनी समाजाला विचारलेला प्रश्न आहे. या प्रश्नातून व्यापारी शेतकऱ्यांची किती फसवणूक, लुबाडणूक करतात हे स्पष्ट होते. व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना वेळोवेळी देशोधडीला लावण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या काळात हे सिस्टीम बदलली. ढोरच उरले नही. वाड्यात फक्त ७,८ मानूसंबी बदलले काय करवं?[२७] या प्रश्नातून पूर्वीच्या आणि आताच्या समाजातील बदल स्पष्ट केला आहे. पूर्वीचे काळी जास्त जनावरे असणे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात होते. परंतु आता

काम कोणी करायचे म्हणून जनावरे सांभाळत नाहीत. हा दोन पिढ्यातील फरक लेखकांनी स्पष्ट केला आहे.

अशाप्रकारे लेखकांनी प्रश्नार्थक शैलीचा वापर केला आहे.

**उद्‌गारवाचक चिन्हांचा वापर :-**

उद्‌गारवाचक चिन्हांचा वापर उत्कंट भावना व्यक्त करण्यासाठी केलेला असतो. पात्रांच्या मनात दबलेल्या भावनांना व्यक्त करण्यासाठी या चिन्हाचा उपयोग केला जातो.

''आपल्याले आपल्या मयातला टमाटा महांगा इकवा

असं वाटतंत दुसऱ्याच्या मयातले भेंडं सस्ते मिव्वा

असं वाटतं, आढीच आपु मार खाई रहाले!''[२८]

लेखकांनी शेतकऱ्यांच्या विषयी राग व्यक्त केला आहे. कारण शेतकरी एकमेकांच्यामध्येच स्पर्धा करत राहतात. संघटना करून समाजाविरूद्ध आपल्या हक्काविरूद्ध लढत नाहीत.

''नहीतं काही सालानं जमीन पुरी नापीक हुई जाईन. जे झालं ते झालं पण आता त ध्यान घ्या गधडीचायई हो!''[२९] लेखकांनी शेतकऱ्यांना जमीनीचा पोत सुधारण्याचा आग्रह केला आहे. तसेच शेतकऱ्यांविषयी खेद व्यक्त केला आहे. कारण स्वतःची जमीन असून ते तिची काळजी करत नाहीत.

''गरीबांना छळणाऱ्या तुम्हा श्रीमंतांचा धिक्कार असतो! थू.. थू.. कशात काय फाटक्यात पाय! थू....''[३०] यातून श्रीमंत लोकांच्या विषयीची तिरस्कार, चीड व्यक्त झाली आहे.

अशाप्रकारे उद्‌गारवाचक चिन्हांचा वापर केलेला आहे. या चिन्हांचा वापर त्यांनी अत्यल्प प्रमाणात केला आहे.

**लोपचिन्हांचा वापर :-**

दिवाकर चौधरींनी 'बुझ्र्वागमन' कादंबरीमध्ये लोपचिन्हांचा वापर मोजक्याच ठिकाणी केला आहे लोपचिन्हांचा वापर कोणतेही वाक्य अर्धवट सोडल्यानंतर किंवा अर्धवट तोडलेले

बोलणे दाखविण्यासाठी केला जातो. एखाद्यावेळीस काही भावना मनामध्ये तशाच दाबून राहतात. त्या कोणत्यातरी कारणास्तव व्यक्त करता येत नाहीत या दबलेल्या भावनांना व्यक्त करण्यासाठी लोपचिन्हांचा वापर करतात.

अरे तुह्यामायचा ढंग...

फटा गोया करारे ..... केल्या.

इसुका घ्यारे... घेतल्या...

बाया माणसाईच गव्हार वायारे ... वायल

अन मंग काटारे.... काटल्या.

अन मंग पेंड्या बांधारे..... बांधल्या

झोपड्या करारे..... केल्या.

दहा पंधरा दिवसाईन कोल्ड्या झाल्या की झोडारे..... झोडल्या.

बारीक बारी तिया गोया करारे..... केल्या

भाऊ, बिघ्याले पोत बी आल नही.[३१]

एवढे कष्ट करून शेतकऱ्यांच्या पदरी एक पोतभर धान्य पडते हे बघून शेतकऱ्याला आश्चर्य वाटते. यातून शेतकऱ्याचा आपल्या नशिबाविषयी चीड निर्माण होते. परंतु ती व्यक्त करू शकत नाही. कारण तो या तोट्याला कोणाला जबाबदार धरणार त्यापेक्षा आपलेच नशिब खोटे आहे. अशी तिरस्काराची भावना त्याच्या मनात निर्माण होते. म्हणून या लोपचिन्हाचा वापर केला आहे.

''व्याजानंच काय पण असेही दिले असते पण माझेजवळ पैसे नाहीत हो. सॉरी. तोच जर तुमच्याजवळ फटफटीवऱ्हे आला तर.....

कारमंधी आला तर.....

तुम्ही निदान विचार तरी केला असता.''[३२]

समाजातील दोन स्तरामधील लोकांची एकमेकांच्या विषयी वागण्याची पद्धत काय आहे. एकमेकांशी ते कसा व्यवहार करतात. समोरच्या व्यक्तिच्या परिस्थितीवरती त्याना मदत करायची का

नाही हे ठरवतात. त्याच्या अडचणीचा विचार करत नाहीत या लोकांच्या विषयी लेखकांच्या मनात द्वेष, रोष निर्माण होतो तो ते शद्वात व्यक्त करू शकत नाहीत. म्हणून लोप चिन्हाचा वापर केला आहे.

''अरे तहे मायचा हिरोन् हिरॉईन. अन तेहे मायचे पहानारे आम्ही कंबर ढिल्ली पडीन तव्हा समजीन.....''[३३] चित्रपटामध्ये नायक-नायिका नाचत गाणं म्हणत पाखरे राखतात खरच का पाखरे राखणे एवढे सोपे आहे. म्हणून अशा लोकांविषयी तसेच ते पहाणाऱ्यांविषयी लेखकांनी संताप व्यक्त केला आहे. राग मनामध्ये निर्माण होऊनही तो व्यक्त करता येत नाही म्हणून लोपचिन्हाचा वापर केला आहे.

**उपमा –**

कादंबरीमध्ये लेखकांनी मोजक्याच ठिकाणी उपमांचा वापर केला आहे. यासारख्या वाक्यप्रयोगांमुळे वातावरणातील प्रत्ययकारीता या कादंबरीमधून दिसून येते.

उदा –

१) ''बिर्ला किसानाई जोय ढोरं रहाले आहे''[३४]

२) ''पन ते मातीमोल का अशेना वावरातला माल घरी आला.''[३५]

३) ''अशा पोया नरम तस कुट नरम''[३६]

४) ''गावठी मुर्गा अन् आताचा संकरित मुर्गा कसा बेचव नुसता स्पंजासारखा. कुच्चा लागतो''[३७]

५) ''दिखनेमे अच्छा चलनेमे ढब्बू. भाजीपाल्याचा मळा खिसा वाजे खुळखुळा''[३८]

बुझर्वागमन ही कादंबरी ग्रामीण असल्यामुळे ग्रामीण भागातीलच उपमांचा वापर केला आहे. त्यामुळे वाक्य अधिक उठावदार दिसतात.

**म्हणी व वाक्प्रचार –**

**म्हणी –**

कादंबरीमध्ये म्हणींचा वापर अतिशय सुंदर पद्धतीने आणि कल्पकतेने करून भाषेचे सौंदर्य वाढविले आहे. भाषेला वेगळेपणा प्राप्त झाला आहे. म्हणीमुळे भाषा अधिक समृद्ध बनते.

**उदा -**

ठोक बोखरा उडे राख, इदम ब्रुयात सत्यम ब्रुयात, घरची करते बोवा बोवा न बाहीरची म्हणते चोई शिवा, राती होत्या गैऱ्ह्या गायी पहाटे उठी काही नाही, तेल बी गेलं न् तूप बी गेलं अन् हाती धोपाटणं आलं, सब घोडे बारा टक्के, गरीब बिचारा माधुकरी दुःख तयाला जन्मभरी! देखी आग लागत नाही तितकी सांगी आग लागते. गंध्याशी कोन कुस्ती खीन इत्यादी.

यासारख्या विविध म्हणींचा वापर कादंबरीमध्ये केला आहे.

**वाक्प्रचार -**

कादंबरीमध्ये म्हणींच्या बरोबर वाक्यप्रचाराचाही उपयोग करून भाषेत अधिक नेमकेपणा येऊन भाषा अधिक आकर्षक वाटते.

जखमेवरती मीठ टाकणे, झाकली मुठ, मुसळ केरात जाणे, जीव गलबलणे, धास्तावणे, कलंक लागणे, माथा सरकणे, दडपण पडणे, भाऊ तऱ्हे देव्वा, आत्मसात करणे, विश्वासात घेणे, दिशाभूल करणे, सुपडासाफ करणे, चैन न पडणे, दिलासा देणे, खायची ददात नसणे, धाक रहाणे इत्यादी वाक्यप्रचारांचा कादंबरीमध्ये वापर करताना

**हिंदी भाषेतील शद्बांचा वापर -**

धिरेधिरे, बकने, रहम, बितने, घडे घडे, दाम, दर्दभरी कहाणी, गधे, भरोसा, खतम, भरोसा, जल्दी, साल, जहर, अंगूर, मतलब, घडीघडी, बेटा, जल्दी, डरने, साल, नरम, मुर्गा, अलवार, दिमाग, उल्लू, बिजली, भरना, बितने इत्यादी शद्ब तसेच, सब घोडे बारा टक्के, गांड मरवाना और बाप का नाम चलाना, जादा किया और पिंजडेपे पडा, जीना यहा मरना यहा, दिखनेमें अच्छा चलनेमे ढब्बू इ. म्हणी, याही हाजी त्याही हाजी. देख अभी है कच्चा दाना पक जाए तब आ, अई तेहे मायचा हिरो न् हिरॉईन, अन तेहे मायचे पहानारे आम्ही, मै मंदिर पहुँचा-हाँजी, मै मसजिद पहूँचा-हाँजी यासारखे हिंदी शद्बांमुळे भाषेचे सौंदर्य वाढते.

## इंग्रजीभाषेतील शद्बांचा वापर

लेखकांनी कादंबरीमध्ये इंग्रजी शद्बांचा वापर जास्त प्रमाणात करून भाषेची मौलिकता, श्रेष्ठता वाढवली आहे. जाणून बुजून शद्बांचा वापर न करता सहजतेने ते वाक्यांमध्ये आले आहेत. उदा –

टेंडसी, रिलॅक्स, मटेरियल, अंडर, कंट्रोल, टेंपरेचर, फॅक्टर ॲक्च्युअल, सायकोलॉजी, डिप्रेस, क्रिटिसिझम, ॲव्हरेज, प्रेस्टीज, सिच्युएशन, डिसिप्लिन, ऑर्डर, लेफ्टराईट, जजमेंट, कंपल्शन, व्हिटॅमीन, क्रेडिट, कॅलक्युलेशन, ग्रॅज्युएट, प्रॉपर्टी, शुट, गव्हर्नमेंट, इन्फेरीटी कॉम्प्लेक्स, प्रॉडक्शन, इज इक्वल टू, थॅंक्यू, इलेक्ट्रिक, एक्साईट, क्विंटल, हॉर्सपॉवर, वॉर्निश, डायरेक्ट, हॉर्सपॉवर, फाऊंडेशन, कॅन्सल, एक्स्ट्रा, वॉर्निश, वाईंडर, वेटींग पिरीयड, सर्टीफाईड, चॅलेंज, टेन्डन्सी, कॉंट्रॅक्ट, लायसन, सरंडर, टेंपरेचर, स्मार्ट, फुटव्हॉल्व, सायकॉलॉजी, रिलॅक्स, ॲक्च्युअल, आयटम, गव्हर्नमेंट, स्क्वेअरफूट, ॲव्हरेज, क्रॉप रोटेशन, मार्केट, इमॅच्युअर्ड, इंटरेस्ट, डुप्लीकेट, ॲटोमॅटिक, सिच्युएशन, प्रेस्टीज, प्रॅक्टिकल इत्यादी इंग्रजी शद्बांचा वापर लेखक वारंवार करताना दिसतात.

तसेच मास्टर इज लायबेल फॉर द ॲक्ट ऑफ सर्व्हंट, उत्पन्न मायनस खर्च इज इक्वल टू झिरो ऑर मायनस. यासारख्या इंग्रजी शद्बांच्या वाक्यांच्या वापरामुळे लेवागण बोलीचे सामर्थ्य वाढले आहे. त्यामुळे भाषा अधिक प्रभावी वाटते.

## शिव्यांचा वापर –

दिवाकर चौधरींनी या 'बुझ्र्वागमन' कादंबरीमध्ये शिव्याचा वापर वारंवार केलेला दिसतो. 'बुझ्र्वागमन' ही कादंबरी ग्रामीण असून कृषी जीवनाशी निगडीत असल्यामुळे अस्सल ग्रामीण शिव्यांचा वापर केलेला आहे. ग्रामीण लोकांच्या तोंडात एक तरी शिवी असतेच. काहीजण तर प्रत्येक वाक्यांबरोबर शिवी देताना दिसतात. पांढरपेशी समाजात शिव्या देणे वाईट मानले जाते. परंतु ग्रामीण समाजात शिव्या या सहजा–सहजी दिल्या जातात. त्याचे शुभ–अशुभ लोकांना वाटत नाही. शिव्यांचा वापर म्हणजे ग्रामीण समाजातील लोकांचे एक अंगच मानले जाते.

उदा –

मादरचोद, मायची च्युत, भडव्या, मातला, गधडीचा, झक मारणे, भोसडीचे, साले, भेंचोद.

या सारख्यां शिव्यांचा वापर लेखक कादंबरीमध्ये करताना दिसतात. शिव्यांमुळे भाषाशैलीला ग्रामीणतेचे मूल्य प्राप्त झाले आहे. भाषा एकदम तीव्र वाटते.

**निवेदन –**

कादंबरीच्या रचनेमध्ये निवेदनाला खूप महत्त्व असते. कादंबरीचे निवेदन म्हणजे विविध प्रसंगांची केलेली रीतसर मांडणी होय. कादंबरीमध्ये वर्णन, संभाषण, स्वभाषण हे घटक निवेदनाच्या गरजेनुसार केव्हाही येत असतात. कादंबरीच्या विश्वात जे काही घडत असते त्याचे कालानुक्रमे आणि तृतीय पुरूषी निवेदन कादंबरीकार करत असतो.

'बुझ्र्वागमन' कादंबरीचे निवेदन वैशिष्ट्यपूर्ण आहे. या सर्व लेखनामधून लेखक आपल्या जीवनातले तसेच शेतकरी समाजातील छोटे–छोटे व साधे प्रसंग चित्रीत करतात. हे प्रसंग आपल्याला छोटेसे वाटत असले तरी शेतकरी जीवनात त्यांना खुप महत्त्व आहे हे रडगाणे नसून प्रत्यक्ष त्यांच्या जीवनातील वास्तव घटना आहे. कादंबरीतील विषयाचे प्रतिपादन प्रभावी आणि सुलभ झालेले आहे हे अनुभव स्वतःच्या शेतकऱ्यांच्या दुःखद जाणिवेतून घेतले आहेत. दिवाकर चौधरींनी कादंबरीमध्ये निवेदनासाठी तसेच पात्रांच्या संवादासाठी लेवागण बोली वापरली आहे. पात्र व संवाद या दोन्हीसाठी एकाच भाषेचा वापर केला आहे. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''निवेदकच शेतकरी असल्यामुळे निवेदकांच्या तोंडी वेगळी भाषा व पात्रांच्या तोंडी वेगळी बोली असा संस्कार करणे त्यांना कृत्रिम वाटते.''[३९] तसेच तृतीय पुरूषी निवेदन पद्धतीचा वापर केला आहे.

कादंबरीचे लिखाण पूर्ण झाले तेव्हा लेखक फैजपूर साखर कारखान्याचे संचालक होते. यावेळी शेतकऱ्यांवर जे अन्याय झाले याला आपणही जबाबदार घटक आहे. याचे त्यांना दुःख होते. म्हणून दिवाकर चौधरी म्हणतात, ''या काळातील सततच्या टोचणीमुळे एका झपाटल्या अवस्थेत हे एकटाकी झालेले लेखन होय. अगदी पहिल्या धारेचे लेखनोत्तर कोणतेही संस्कार न

झालेले''[४०] लेखकांनी शेती करताना प्रत्यक्ष स्वतः अनुभवलेल्या समस्या, घटना, 'बुझ्र्वागमन' या कादंबरीतून आत्मनिवेदनात्मक पद्धतीने मांडल्या आहेत. दिवाकर चौधरी कादंबरीमध्ये तृतीय पुरूषी निवेदन पद्धतीचा वापर पुढील प्रमाणे केला आहे.

उदा –

''पण हे असं जर माह्याच बाबतीत असतं त तुमचं म्हणनं मीनं खरंबी म्हटलं असतं. माही भले लाज वाटली असती. तुम्हाले सांग्याचा मले काहीच अधिकार राहाला नसता पण सगळ्या करनाऱ्याइच्या मायीबी हेच आहे. कितलाबी अल्पभूधारक असला तरीबी त्याची गोची माह्या सारखीच होते.''[४१]

अल्पभूधारक आणि मोठे शेतकरी या दोघांच्यामध्ये काहीच फरक नाही. कारण दोघांनाही तेवढेच कष्ट शेती करताना करावे लागतात हे या निवेदनातून स्पष्ट होते.

''आम्ही खायाचं म्हणून खातू, पेयाच म्हणून पेतू, हशाच म्हणून. हसतू पण मंधी जर तुम्हन पहाल तर तुम्हाले एकच गोट दिशीन. चिंता निव्वळ आनंद काय असतो हे आम्हले माहीत नही. नही म्हणजे निव्वळ खाणं, निव्वळ पेणं निव्वळ झोपणं. हे नुसत निव्वळ आमच्या जोय नही. कोणाच्याबी क्रियेले घोर नावाचा फॅक्टर लागेल रहातो. अन् त्याची कारण मीमांसा पाहली तू जास्तीत जास्त गधडीचे हे जबाबदार असता.''[४२] लेखकांनी शेतकऱ्यांच्या जीवनात ज्या किरकोळ घटना त्या घटनांपाठीमागे थोडीतरी काळजी असतेच कोणतीच गोष्ट ते सुखा समाधान घालवू शकत नाहीत. अशाप्रकारे दिवाकर चौधरीनी कादंबरीमध्ये निवेदनाचा वापर करून कथानक गतिमान केले आहे.

**बुझ्र्वागमनची प्रेरणा –**

दिवाकर चौधरी यांनी 'बुझ्र्वागमन' ही कादंबरी २६ जानेवारी २००७ रोजी प्रकाशित केली. साधारणतः ऑक्टोबर १९९६ मध्ये या कादंबरीचे लिखाण पूर्ण झाले. लेखक त्यावेळी फैजपूर साखर कारखान्याचे संचालक होते. कारखान्याच्या गाळक्षमतेपेक्षा जास्तीचा ऊस पेरा झाल्यामुळे कारखाना पूर्ण ऊस तोडू शकला नाही. कित्येक शेतकऱ्यांना ऊस अक्षरशः

जाळावा लागला. यापाठीमागे कारखान्याची नियोजन शून्यता किंवा राजकारण असू शकेल, परंतु याकडे लक्ष न देता शेतकऱ्यांचे कधीही भरून न निघणारे जे नुकसान झाले, त्या परिस्थितीला व्यवस्थेतील मानव निर्मित वा नैसर्गिक याला लेखकही एक जबाबदार घटक आहेत. या काळातील सततच्या टोचणीमुळे एका झपाटल्या अवस्थेत हे एकटाकी झालेले लेखन आहे. अगदी पहिल्या धारेचे लेखनोत्तर कोणतेही संस्कार न झालेले. १९६८ पासून १९९७-९८ पर्यंत लेखकही शेती करत होते. त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था काय आहे. याचा त्यानाही चांगलाच अनुभव आहे. लेखकांजवळ ५० एकर जमीन होती. ३० वर्षात कितीतरी हंगाम झाले पण शेतीसाठी काढलेले कर्ज कधी उत्पन्नातून फिटलचं नाही त्यामुळे कर्जाचा डोंगर लेखकांवर ही वाढत होता. लेखकानाही मार्ग दिसत नव्हता. म्हणून लेखक त्यांच्याजवळ असणाऱ्या जमीनीतून कलेजाचा तुकडा तोडावा तसा लेखक तो तुकडा विकायचे अन् मानेतला फास बाजूला करायचे म्हणून लेखकांवर आत्महत्येची वेळ आली नाही. परंतु त्यांच्याजवळ जमीनीची बाब कमी असेल त्यांनी काय करायचे त्यामुळे त्यांच्यावर फक्त आत्महत्येशिवाय पर्याय नव्हता. दिवाकर चौधरी मनोगतामध्ये म्हणतात, ''या कादंबरीच्या लेखन सुमारास दक्षिणेकडल्या एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचे वृत्त वाचनात आले. यानंतरही हे मृत्यूपर्व इकडे येण्यापूर्वी अशा तुरळक बातम्या माझ्या वाचनात येत राहिल्या आणि सह अनुभूतीतून शेतीतून लेखकाना आलेल्या उद्विगनावस्थेतून मी हे लिहले.''[४३]

याचाच अर्थ शेतकरी समाजाचे प्रबोधन करणे आणि या समाजाला प्रगतीच्या प्रकाशाची दिशा दाखविणे होय. या कलाकृतीचा आशय मुळात शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे आहे. तेल, साखर, कांदा, ज्वारी यांचे थोडे जरी भाव वाढले तर सत्ता कोसळते. त्यामुळे ह्या राजकीय मानसिकतेचे पहिले बळी शेतकरीच राहतात. आपली सरकारे व त्यांची लोकप्रियता टिकविण्याच्या स्पर्धेत शेतकऱ्यांची जी कुचंबणा झाली ती अतिशय भयावह आहे.

**समर्पक शीर्षक –**

'बुझ्वागिमन' या 'दिवाकर चौधरी' यांच्या ग्रामीण कादंबरीच्या शीर्षकातून शेतकरी समाजाचे त्यांच्या समस्यांचे चित्रण शद्बबद्ध केले आहे. या शीर्षकातून लेखकांचे निरागस, निर्व्याजमन आपल्या डोळ्यासमोर उभे रहाते. मनाला अस्वस्थ करणाऱ्या शेतकरी लोकांच्या आयुष्याची परवड त्यांच्या व जीवनाची वास्तवता येथे चित्रित केली आहे.

अल्पाक्षर बहुआयामी शीर्षक कथानकाला साजेसे आहे. 'बुझ्वागिमन' म्हणजे बुरसटलेल्या विचारांचे पुराणमतवादी होय. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते '' बुझ्वा हा फ्रेंच शद्ब असून त्याचा मूळचा अर्थ, 'आश्रयदाता' मालक असा आहे. मध्ययुगीन काळात काला व हस्तव्यवसाय यावर जगणाऱ्या आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या, कृषकवर्ग व सरंजामदार यांच्यामध्ये मोडणाऱ्या मध्यमवर्गाला 'बुझ्वा' म्हणण्यात येऊ लागेल. 'बुझ्वा' संज्ञा /नाम किंवा विशेषण अशा दोन्हीप्रकारे वापरण्यात येते. यांत्रिकीकरण व कारखानदारी यामंळे मध्ययुगीन हस्तव्यवसायी नाहीसे होऊन त्याजागी मालक व कामगार असे दोन वर्ग निर्माण झाले. वर्गकलहाच्या संदर्भात 'बुझ्वा' हा शद्ब केवळ मालकांना उद्देशून वापरण्यात येऊ लागला''. [४४] 'बुझ्वा'या शद्बात पुराणमतवादी विचारांबरोबरच एक प्रकारे शोषण करणाऱ्या प्राचीन परंपरांचे पुनुरूत्जीवन लेखकाना अभिप्रेत आहे. कारण मुजोर झालेला अप्रामाणिक फुकटखाऊ मजुर वर्ग, जो त्याला हवी तेवढी; तोंडाला येईल ती मजुरी घेऊन ही पुरेपूर मोबदला कामाच्या रूपात देत नाहीत. संपूर्ण महाराष्ट्रातील ढासळत जाणारी कृषी व्यवस्था, गरीब झालेला शेतकरी याला कारणीभूत ठरला. मजुर हा घटक दिवाकर चौधरींच्या रागाच्या केंद्रस्थानी आहे. या सगळ्या स्वार्थ प्रेरीत, अप्रामाणिक, अन्याय व्यवस्थेपेक्षा जुनी अर्थाथ प्रतिगामी अत्यंत अल्प मजुरी देऊन राब–राब राबवून घेणारी पूर्वीची व्यवस्था चांगली होती. या विचाराप्रत आलेली हताश जाणीव हे शीर्षक सुचित करते. उदा. शेतकरी बांधव मजुरांच्या विषयी असा विचार व्यक्त करतात की, ''आम्हाले कर्जबाजारी करणारे हेच हो.... बाया बी अशा निंदता की दुसऱ्या दिवशी जाईसन् पहाव्वा की तन् हजर, वऱ्हेच्या वऱ्हे कुरतडता. नवरे तशा बायका कारण याहिनले अख्खा जगानं लायसन्स देल आहे कसं बी वाग्याचं घ्या याहींच उप्पाडीसन!''[४५] पूर्वीच्या काळी म्हणजे लेखकांच्या वडिलांच्या काळातील व्यवस्था व लेखकांच्या काळातील व्यवस्था कशी

होती याचा प्रत्यय येथे येतो. ''इच्यारीसनं नेल तर बाप्पा लयच दिलदार राहे. पन् न इचारता बहादराले एक बोर खपेना. माह्या टायमात मात्र मयाची शानच गेली, आओ जाओ घर तुम्हारा.''[४६] अशा बदलत्या समाजाचे दर्शन घडते.

**मुखपृष्ठाचे सौंदर्य –**

दिवाकर चौधरी यांचे 'बुझ्र्वागमन' हे पुस्तक दर्शनीय व दर्जेदार आहे. या साहित्यकृतीचे मुखपृष्ठ सुचक, सुंदर आहे. तसेच मानवी मनाच्या संवेदना जागविणारे आहे. मुखपृष्ठावरती केळीचे पान आणि एका गरीब दुःखी शेतकऱ्याचे चित्र आहे. केळीचे पान हे अर्धे हिरवेगार आणि अर्धे पाणी कमी पडल्यामुळे, रोग आल्यामुळे पिवळे पडलेले थोडसे करपलेले आहे. आणि या पिवळ्या पडलेल्या पानाच्या भागाखाली शेतकऱ्यांचा चेहरा अर्धा झाकलेला आहे. या शेतकऱ्याचे चित्र पाहिले की असे दिसते. शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचे निरागस भाव कोणतीतरी वेदना व्यक्त करत आहेत. ही वेदना काळजाला हात घालणारी आहे. शेतकऱ्याचा चेहरा चिंतातूर, दुःखी दिसत आहे. या दुःखातून त्यांनी आपल्या वाट्याला आलेल्या वास्तवतेचे चित्रण केले आहे. शेतकऱ्याचा चेहरा पिवळ्या पडलेल्या केळीच्या पानासारखा सुकलेला करपलेला आहे. शेतकऱ्याचे आयुष्यच या केळीच्या पानासारखे असते. केव्हा बघू तेव्हा फाटलेले, चिरलेले, करपलेले कितीही जोडण्याचा प्रयत्न केला तरी ते जोडता येत नाही. संपूर्ण केळीचे पान आजच्या शेतकऱ्यांचे प्रतिकच वाटते. अर्धा समाज प्रगतीच्या वाटेकडे चालला आहे तर अर्धा दारिद्र्याच्या गर्ततेत सापडला आहे. लेखक हे स्वतः शेतकरी असल्यामुळे त्यांनी शद्बबद्ध केलेल्या समस्या फक्त त्यांच्यात नाहीत तर देशातील सर्व शेतकरी बांधवांच्या सार्वत्रिक दैन्यावस्थेचे हे चित्रण अतिशय उत्कृष्ट, समर्पक, वास्तव असून ह्रदयाला भिडणारे आहे.

**सारांश –**

'बुझ्र्वागमन' ही कादंबरी फक्त लेखकांनीच अनुभवलेल्या समस्यांविषयी नाही तर देशातल्या सर्व बळीराजांच्या समस्या, व्यथा इथे शद्बबद्ध झाल्या आहेत. या सर्व समस्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न दिवाकर चौधरींनी 'बुझ्र्वागमन'च्या माध्यमातून केला आहे. जे लोक


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शेतीपासून खुप दूर आहेत. त्यांना शेतकरी म्हणजे सुखी वाटतो. अशा लोकांना किमान शेतकऱ्यांची अवस्था नेमकी कशी आहे. याचे थोडेतरी आकलन व्हावे. एखाद्या शेतकऱ्यांच्या घरात वर्षभर कुणीतरी व्हिडीओ कॅमेरा लावून ठेवावा आणि 'रिअल टाईम' फिल्म आपण पहावी असा अनुभव दिवाकर चौधरी यांची 'बुझ्र्वागमन' कादंबरी वाचताना येतो.

'बुझ्र्वागमन'चे महत्व कादंबरीतील कथानक, प्रसंग, व्यक्तिचित्रण इत्यादी घटकांमुळे न वाढता दिवाकर चौधरींनी शद्बबद्ध केलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या त्या मांडण्याची पद्धत यामुळे वाढलेले दिसते. एक एक घटना शेतकऱ्यांचे खरे जीवन उलगडून दाखवताना दिसते.

'बुझ्र्वागमन' मधील भाषाशैलीला आकर्षक करण्यासाठी फारसा प्रयत्न लेखकांनी केलेला नसून जे आहे ते त्यांनी लेवागण बोलीतून वास्तव पद्धतीने साकार केले आहे. दिवाकर चौधरींनी जे लेखन केले आहे त्याविषयी ते स्वतःच म्हणतात, ''तसा मी बारीक सारीक तपशील सांगत बसणार नही तं ढोबळ सांगीन तसं त मंग एकच पिकाले अख्खी कादंबरीच सांगनी पडीन.''[४६]

### ७) आशय –

आपल्या जवळ सांगण्यासारखे काही आहे ते इतरांपेक्षा वेगळे आहे ते इतराना सांगावे आणि आपल्या मनातील वेदना कमी कराव्यात या उद्देशाने अनेकांनी लेखन केले आहे. अशाच पद्धतीने शेतकऱ्यांच्या जगण्यातला संघर्ष आणि शेतकऱ्यांचे सुख दुःख, शेतकऱ्यांचे प्रश्न अशा वास्तवतेच्या विविध आणि सुक्ष्म अतिसुक्ष्म दिशा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून साहित्याच्या विविध प्रकाराबरोबर कादंबरीतून मुख्यतः प्रकट होऊ लागल्या शेतकऱ्यांची दयनीय अवस्था समाजासमोर येऊ लागली.

अशाच पद्धतीने समकालीन वास्तवधारी जीवनानुभव दिवाकर चौधरींनी 'बुझ्र्वागमन' कादंबरीमधून शद्बबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबरीमध्ये शेतकरी जीवनाचा पटच साकारलेला आहे. 'बुझ्र्वागमन' या कादंबरीतून प्रकट होणाऱ्या शेतकऱ्यांच्या सार्वत्रिक समस्या, वेदनाचे दर्शन अत्यंत प्रभावी आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनात वाट्याला येणाऱ्या अनेक समस्या आणि प्रश्न यांचे समर्पक वर्णन इथे पहायला मिळते. दिवाकर चौधरीनी 'बुझ्र्वागमन' मध्ये केलेले शेतकरी जीवनाचे वास्तव वर्णन हृदयाला पीळ पाडणारे आहे. शेतकरी जीवनातील समस्यांना, अनेक अडचणींना वारंवार तोंड देवून जोमाने पुन्हा कसे उभे राहतात. अशा गोष्टी स्पष्टपणे आपल्या समोर मांडण्याचा प्रयत्न दिवाकर चौधरींनी केला आहे.

पूर्वीच्या काळी लोक एकमेकांचा मान राखायचे. एकमेकांचा आदर करायचे. गावातील पाटील घरांना प्रतिष्ठा होती. आजकाल काही तसे राहिले नाही. जो तो स्वतःला शहाणा समजू लागला आहे. कोणालाच कोणाचे योग्य वाटेना जो तो मनाचा मालक. त्यामुळे गावातील वातावरण एकदम बदलले आहे.

शेतकऱ्यांच्या मुलांचीही अवघड अवस्था झाली आहे. मुलगा शेतकरी म्हटलं की कोणी मुली द्यायला तयार नाही. साधीसुधी नोकरी किंवा छोटासा व्यवसाय करणारा मुलगा चालतो. परंतु शेतकरी नको. मग कितीही एकर बागायत असो. शेतीमुळे शेतकरी मुलांसमोर लग्नासारखी साधी गोष्ट एवढे मोठे वळण घेत आहे. मग इतर गोष्टींचं काय त्याना तोंड कसे द्यायचे.

मजुरांचीही अवस्था खुप वाईट आहे. त्यानाही शेतकऱ्यांची पर्वा नाही. मजुरांचे कितीही चुकले तरी शेतकऱ्यांनीच माघार घ्यायची. कारण त्याना वेळोवेळी मजुरांची गरज असते. मजुरांना काय इथं नाही तिथं. सालाने कामाला राहणाऱ्या सालगड्यांची तर खूप अवघड अवस्था असते. ते वेळोवेळी  मालकांकडून पैसे उचलून नेतात. आणि एखाद्या वेळेस मालक रागवून बोलला तर काय लगेच सोडून निघाले. मालकाकडून जादा घेतलेल्या पैशाचे त्याना काय मग शेतकऱ्यांनी त्यांना जाऊन द्यावे तर पैसे बुडणार आणि तिथ जाऊन दम देऊन पैसे घ्यावे तर पैसे दिलेला पुरावा काहीच नाही. कायद्याने वसूल करायचीही काही सोय नाही. शंभर भानगडी मागे लागतात. अन शिवाय सरकारच्या दृष्टीनेही शेतकरीच बेकायदेशीर कारण पैसे दिले तेव्हा पुरावा  ठेवला नाही. भांडण करावे तर लगेच गरीबांवर अन्याय केला म्हणून टि. व्ही., पेपरवाले सगळे ओरडायला रिकामे म्हणून दिवाकर चौधरी म्हणतात की, ''सायकलवाल्याची अन् फटफटवाल्याची टक्कर झाली की फटफटवाला चूक. फटफटवाल्याची अन् मोटरवाल्याची

टक्कर झाली की मोटरवाला चूक अन् पायदळवाल्याशी याहिंची कोन्हाचीबी टक्कर झाली की पायदळवाला बरोबर, ए बहिनसु मातले.''[४८]

मालक झाले नोकर आणि नोकर झाले मालक अशी वाईट अवस्था शेतकऱ्यांच्यावर आली आहे. बरं मजुर सोडून घरच्याघरी काम तरी कसे करणार. एकट्या शेतकऱ्यांनी कोणते म्हणून काम करायचे. गुराढोरांचे बघायचे का शेतातले बघायचे का बाहेरचे. शेतात काय एकच काम असते. एक एकरवाला असो वा दहा एकरवाला सर्वांची एकच अवस्था मजुरांशिवाय पर्याय नाही.

मोटर बिघडल्यावर शेतकऱ्यांना राहून राहून ह्या मोटारी बरोबर एक शिल्लक मोटर आणून ठेवण्याचे स्वप्न असते. मोटर बिघडली की शेतकरी ते स्वप्न साकार होण्यासाठी धडपड करतो पण वाट्याला निराशा येते. कारण बिघडलेली मोटर दुरूस्त करताना शेतकऱ्याना एवढा त्रास होतो की दूसरे काही करण्याकडे त्यांचे लक्षच लागत नाही. साधी मोटर विकत घेण्याचे शेतकऱ्याचे स्वप्नही साकार होवू शकत नाही.

गावातील आठवड्याच्या बाजारादिवशी शेतकऱ्यांची अवस्था खूप वाईट असते. शेतकऱ्यांजवळ पैसे नसल्याने रोजगाऱ्यांना बाजारादिवशी कुठले पैसे द्यायचे. काहीही करून ते दिले तर बरे नाहीतर शेतकऱ्यांची पंचायत होते. या ठिकाणी दिवाकर चौधरी म्हणतात, ''मजुरी नही देवाली की गधडीचे गैऱ्हे बोंबलत जाता. अख्खा गावापुढे इज्जतचा पंचनामा करता.''[४९]

'तोंड दाबून बुक्यांचा मार' अशी अवस्था शेतकऱ्यांची होती. शेतकऱ्यांपेक्षा मजुरीच्या पैशावर मजुरच श्रीमंत व्हायला लागले आहेत. जे शेतकऱ्यांकडे नाही ते मजुरांकडे आहे.

कादंबरीमध्ये सर्व कामे करण्यासाठी जी नामदेव, मोहन, विकास, भाना वाईंडर, रामा बारकरी ही व्यक्तिचित्रण आली आहेत. ती अतिशय उठावदार आहेत. त्यामुळे शेतकरी जीवनाचा पट ते स्वतः शेतकरी असल्यामुळे जसाचा तसा वटवण्यात यशस्वी झाले आहेत.

शेती करणे म्हणजे फक्त नांगरणी, कुळवणी, पेरणी नाही तर शेती म्हणजे निसर्गाशी जनावरांशी बोलणे होय. या दोघांशीही एकरूप व्हावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांचे व मातीचे नाते अतुट असते. या सर्व गोष्टींना कंटाळल्यामुळे लेखक सांगतात की वर्षभर शेतकऱ्यांनी स्वतःला पुरेल एवढेच धान्याचे उत्पादन काढले पाहिजे. त्यातील थोडेसुद्धा इतराना देऊ नये. म्हणजे

इतराना शेतकऱ्यांची किंमत कळेल. जरा जरी कुठे गहू, तांदुळ महागले तर लगेच महागले, महागले म्हणून गोंधळ करतात. शेतकरी जर असे वागू लागले तर काय हे लोक लोखंड खातील. शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे कोणीचं उभे नाही म्हणून निवेदक दिवाकर चौधरी म्हणतात, ''आमच्याकडून कोन्हीच नही, पेपरवाले नही की पुढारी नही की कोन्हीच नही. कारण आम्ही सर्टीफाईड गरीब नही. पण एक दिवस उजडीन, मी त चॅलेंज देतो. एक एक क्षण म्हणजे एक एक गोष्ट आहे.''[५०] लेखकांना शेतकरी एक ना एक दिवस सुधारेल याची अपेक्षा आहे. तसेच त्यांची द्विधाअवस्था झालेली आहे. गरीब म्हटल तर कोणत्या तरी सुविधा तर मिळतील आणि श्रीमंतीत मोडत असतील तसा त्याना उपभोग तरी घेता येईल. धड ते गरिबीतही मोडत नाहीत किंवा श्रीमंतीतही अशी दयनीय अवस्था त्यांच्या वाट्याला आली आहे.

एखाद्या वेळेस मोटर दुरूस्त करताना एखादा मजुर किंवा वायरमन जर विहिरीत पडून मेला तर त्यांच्या घरचे सगळे ओरडत मालकाच्या घरी येतात. तो मजुर स्वतःच्या हलगर्जीपणाने पडला असला तरी त्याचे खापर मालकावरच फोडायचे. तो मरतो पण सगळा घोर मालकाला लावून जातो. घरच्याना पैसे दिले की हे गप्प बसतात. इथे गरीब लोकांची वागण्याची पद्धत कशी विचित्र असते हे लक्षात येते.

निसर्गानेही कधी शेतकऱ्यांना भरघोस साथ दिली तर कधी खड्ड्यात घातले. दरवर्षी खंबीरपणे असा कधी निसर्ग शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहिलाच नाही आणि ज्यावेळेस उभा राहिला त्यावेळी कधी व्यापाऱ्यांनी तर कधी दरांनी धोका दिला. पाऊसाविषयी तसेच रणरणत्या ऊन्हाविषयी बोलताना दिवाकर चौधरी म्हणतात, ''आतापासून ऊन तप्याले लागे बी गेलं. ए बहिनहु, इतका पाऊस झाला, प्रत्येक नक्षत्रात पाऊस आला. तरीबी आपल्याकडे तपतच. म्हटल आपल्याकडे आवंदा पाऊस जास्त होएल आहे. तं टेंपरेचर निदान थोडातरी कमी राहीन, पण कशाच काय न कशाच काय.''[५१]

समाजात कोणत्याही गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव न घेता लिहणारे खूप असतात. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे हे ज्याचे त्यालाच माहित असे. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''जो बी समाजवादाबद्दल लिहिन त्याले बयजबरीन शेती कऱ्याले लाव्वा. अन दोन-तीन वर्षानंतर



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सांगावा समाजवादाबद्दल लिह्याले. अरे तुह्या मायचा समाजवादाचा चोद्या कितलक देतू मजुराईले ते पाहू. हाओ पाहू. मंग समजीन गधडीच्याले काही बी लिहीत रहाता अन नसता दुसऱ्याच्या जिवाले घोर, लांवता स्वतः बोंब पाडा मग समजीन.''[५२] एक दुखणं संपलं तर दुसरं रहातच! दुसरं संपलं त तिसऱ्याचाच घोर लागतो. अस रहाट गाडग शेतकऱ्याच्या मागे सतत चालू असत.

शेती करतानाही शेतकऱ्यांना विचार करून पीक घ्यावे लागते. कारण कोणत्या पीकामुळे कर्ज फिटणार आहे कोणते फक्त दिखाऊच आहे. तर कोणत्या पीकाला म्हणावा असा दर आहे. या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''शेतकऱ्यांच्या मते कर्ज फेडण्याचा बाग हा मुख्य आयटम! कर्ज फेडण्याचाबी जिवारी कर्ज फेडू शकत नाही. पोते गैन्हे राहता पण हातात झाटा राहतो. तरीबी किसान पेरतो. मंग का दरवर्षी बागच लाईन? बागावऱ्हे बाग लावता येत नाही. त्याच्यानं वावर पांचट होते. त्याच्यानं दोन दानेबी घरात राहतीन अन् चाराचुराबी हुईन या इराद्यानं तो जिवारी पेरतो.''[५३]

बागाईतदार शेतकऱ्यांना निदान ऊस तरी लावायला येतो. शेत हिरवे राहते. त्यामुळे गवत, ऊसाचे वाढ, चार दोन केळीची झाडे तरी मिळतात. शेत हिरवेगार असल्यामुळे सावकार म्हणा, व्यापारी म्हणा, वेळ पडली तर उचल देतात. कोरडवाहू शेतकऱ्यांना कोण उचल देणार. त्याना ज्वारी, तीळ, कापूस अशी पीके घ्यावी लागतात. कारण त्याना कोणत्यातरी एका पीकातून तरी आपल्याला चार पैसे मिळतील असे वाटते अशी बिकट अवस्था शेतकऱ्यांची आहे.

वरील सर्व समस्या वाचल्यानंतर कोणतीच व्यक्ती शेतकऱ्यांकडे बोट दाखवू शकणार नाही. थोड्या का प्रमाणात असे ना शेतकऱ्यांच्या वेदना त्यांना जाणवतील कादंबरी वाचेपर्यंत तरी शेतकरी कशा पद्धतीने जीवन जगत आहेत याचे वास्तव चित्रण अनुभवतील.

ज्वारी, तीळ, तूर, मूग, जवस, उडीद अशी अनेक कोरडवाहू पीके शेतकरी घेत असतात. मोठ्या उत्साहाने हंगाम आणत असतात. शेवटी सगळी उलाधाल करून त्यांच्या हातात काय पडते. हे त्या शेतकऱ्यानाच ठाऊक. दुरून दोन एकर, तीन एकर, जवस, तीळ पाहणाऱ्याना ती चांगलीच दिसते. प्रत्यक्ष मळणी झाल्यावर शेतकऱ्याच्या हातात काय पडते. याचा विचार मात्र कोणीच करत नाही. फक्त भरघोस आलेले पीकच सर्वांना दिसते. एवढ झाले तरी शेतकरी मागे हटत नाही. वर्षानुवर्ष तो नव-नवीन स्वप्ने पेरून ती फुलवण्याचा प्रयत्न करत असतो.

शेतकरी समस्यांबरोबर निवेदकांनी राजकीय परिस्थितीचेही वर्णन वेळोवेळी केलेले आहे. राजकारणात सगळीकडे भ्रष्टाचार वाढला आहे. जो–तो आपल्यापूरता विचार करू लागला आहे. आपले पोट भरले की झाले मग त्यावेळी दूसरा उपाशी राहिला आहे का किंवा त्यामुळे दुसऱ्यावर कोणती अडचण आली का याचा विचार करायला कोणी तयार नाही. मतदानापुरते हे ढोंगीलोक जनतेला विचारतात एकदा का निवडून आले की पून्हा त्यांच्याकडे मागे वळूनही पहात नाहीत.

लेखकांनी शेतात ज्वारी पेरली होती पीकही चांगले जोमाने आले होते. यावर्षी दरही खूप होता. ज्वारी राखायला एक मजुर ठेवला होता. पूर्वी त्या ज्वारी राखणाऱ्या मजुराला ठरलेली ज्वारी असे ती घालायची पद्धत होती. तो मजुर शेतात रोज पाखरे राखत असे म्हणून अचानक लेखक शेतात गेले तर तो निवांत झाडाखाली झोपला होता. तेव्हा लेखकांना त्याचा खूप संताप आला होता. पण काहीही करू शकत नव्हते कारण हे मजुर जागोजागी मालकाची बदनामी करतात आणि शेतकऱ्यांनाही त्यांची वारंवार गरज असते. एवढ्यानं काही होत नसते म्हणून लेखक म्हणतात, ''तुम्हन कॅमेरा फक्त तीन गोष्टीवरून फिरोयाले पाहिजे होता. माह्या चेहऱ्यावरून, इथ्थर बिथ्थर दाने असलेल्या कनसाईवऱ्हून अन् निंबाखाली जपेल असलेल्या राखोयावऱ्हून म्हणजे तुम्हाले आमचं जीवन समजलं असतं.''[५४]

लेखकांनी शेतकऱ्यांना वारंवार संघटना करायला सांगितले आहे. कारण त्याशिवाय शेतकऱ्यांच्या हक्कांना वाचा फुटणार नाही. त्यांना न्याय मिळणार नाही या संदर्भात दिवाकर चौधरी म्हणतात, ''आपल्या रक्तामधीच शेती करनं आहे. म्हणूनच आता आपल्याले युनिटी करनं भाग आहे. आपण जर युनिटी केली त देशातच काय पण जगात अजिंक्य आहे. आपल्यापुढे जगाले नमनं पडिन त किरकोळची काय बात जयहिंद.''[५५]

दरवेळी शेतकऱ्यांच्या नुकसानीचे कारण निसर्गच असतो असे नाही. ज्या ठिकाणी पाणी आहे. त्याठिकाणचे शेतकरी तरी सुखी पाहिजेत पण तिथले प्रश्न पुन्हा वेगळेच तयार होतात. सावकार, सरकार, मजुर, निसर्ग ही सर्वजण थोडी–थोडी शेतकऱ्यांच्या नुकसानीला कारणीभूत आहेत. लेखकांच्या मते सर्वात जास्त शेतकऱ्यांचे नुकसान मजुर करतात.

सावकारांचीपण अशीच वाईट अवस्था आहे. सावकार काय शेतकऱ्यांना घरी जाऊन पैसे देत नाहीत. शेतकरीच त्यांच्याकडे मदत मागायला जातात. सावकार त्यांच्या अडचणीला मदत करायला जातात. शेतकरी त्यांचे व्याज वेळेवर देत नाहीत. आणि मग कर्ज फिटेना म्हणून आत्महत्या करतात. शेवटी सावकारांची बदनामी. जगातले निम्मे साहित्य नाटक, कादंबऱ्या सावकारांच्या विरोधात, पेपर, पुढारी सगळेच हिंदी सिनेमामध्ये तर बघायलाच नको सगळेच सावकाराच्या मस्तकी खापर फोडून रिकामे. खोलवर जाऊन कोण विचार करत नाही. फुकटच शेतकऱ्यांवर प्रेम दाखवणार नाटकी सगळे.

सर्वांनी आपल्याला खायला म्हणजे दोन वेळच्या जेवणाला किती खर्च येतो हे पाहिले तर तो इतर खर्चापेक्षा खूपच कमी असतो. इतर खर्चच जास्त असतो. त्याची महागाई कोणाला दिसत नाही. फक्त धान्याचेच भाव वाढलेले दिसतात. असे का? टि.व्ही., फोन, लोखंड याचे भाव वाढले यावर कोणी आक्षेप घेत नाही. प्रसारमाध्यमेही यांच्याविरूद्ध जरादेखील आवाज उठवत नाहीत. तेही धान्यवाढीविरूद्ध लिहित राहतात. काही वेळा तर एखादी बातमी न छापण्यासाठी पैसे घेतात. या देशात स्पष्ट मत मांडण्यासाठी तटस्थ वृत्तपत्रांची गरज आहे.

कोरडवाहू पीकांबरोबर निवेदकांनी बागायती पीकांचेही वर्णन अतिशय योग्य शद्बात केलेले आहे. चित्रपटामध्ये तर बागायतदार म्हटलं की रूबाबदार, दुसऱ्यांवर अन्याय करणारा श्रीमंत असा दाखवत. परंतु या गोष्टीला कोणी कधी विरोध केलाच नाही. वेड्यासारखे सगळे  बघत राहिले. खरचं अशी अवस्था आहे का बागायतदाराची. बागायत पीकामधील ऊस हे पीक पैशाचे पिक आहे. परंतु त्यापुढे आता किती समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या समस्या ऊस उत्पादक शेतकरीच अनुभवत आहेत. किती वाईट अवस्था आहे. ते त्याचे त्यालाच ठाऊक. ऊस लागणी पासून तो कारखान्यात पाठवेपर्यंत करावी लागणारी धडपड असह्य आहे.

या सर्व गोष्टींना कंटाळून शेतकऱ्यांची धरणीमातेवरची श्रद्धा कमी झाली आहे. शेतात राबणाऱ्या मजुरांमुळे तर शेतकरी वैतागून गेला आहे. वेळच्या वेळी या मजुरांना

पैसे दिले तर बरे  नाहीतर सगळ्या गावभर बदनामी करत फिरतात. मजुरांची कामाची पद्धत तर सर्वांना माहित आहेच. फक्त कसाबसा दिवस भरायचा. त्यामुळे शेतकरी आता मजुर लागणार नाही अशी स्वयंचलित यंत्रे घेऊन शेती करू पहात आहे.

केळीच्या बागेचीही अशीच वाईट अवस्था आहे. व्यापारी शेतकऱ्यांना पुरेपूर लुटतात. तरी शेतकऱ्यांना काहीही म्हणता येत नाही. कारण दुसरा व्यापारी बोलवावा तर सगळेच एकमेकांना मिळालेले असतात. त्यापेक्षा गप्प बसलेले बरे. कारण जे मिळतयं तेही पुन्हा पदरात पडायचे नाही. अशी परिस्थिती शेतकऱ्यावर येते. शेतकऱ्याना लुबाडण्याच्या कामात व्यापाऱ्यांचाही वाटा मोठा आहे. शेतकऱ्यांना सगळ्यात परवडणारी गोष्ट म्हणजे गुरे कारण त्यांना घरी भरपूर दूध-दुभत खायला प्यायला मिळते. शेतीसाठी खत मिळते. डेअरीत दूध घातल्यामुळे  घरखर्चाला पैसेही मिळतात. ही जनावरे म्हणजे घरच्या सदस्यांप्रमाणे वाटतात. एखादी जरी गाय, म्हैस विकली तरी शेतकऱ्यांना खूप वाईट वाटते. म्हैस विकंतानाही ती शेतकरी कुटुंबात विकली तर चांगली. बाहेर किंवा कसाबाला विकायचे त्यांना खूप वाईट वाटते. शेतकरी जनावरांवर आपल्या मुलांप्रमाणे प्रेम करतात.

लेखकांच्या मते केळी हे सर्वात स्वस्त मिळणार कॅलरीज असणार फळ आहे. व्हिटॅमीनयुक्त म्हणून केळी हे राष्ट्रीय फळ समजले पाहिजे  खायला सक्ती करायला पाहिजे. कांदा, केळी, संत्रा, बेदाणे, आंबे अशा अनेक बागायत पीकांचे वर्णन दिवाकर चौधरींनी अतिशय समर्पक शद्बात केले आहे.

लेखकांच्या वडिलांच्या काळात गावातील वातावरण अतिशय चांगले होते. लोक मोठ्या घरातील लोकांना आदराने वागवत. आता समाज बदलला आहे. कितीही मोठी व्यक्ती असली तरी. ती त्याच्या घरी मोठी आमच्याजवळ नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ह्या सर्व गोष्टी बाजूला ठेवून आता आपल्याला जमीनीच अर्थशास्त्र पहाणे आवश्यक आहे. फक्त भावनावश होऊन चालणार नाही. कित्येक पिढ्या या मातीत गाडल्या गेल्या तरीही आपण सुधारलो नाही. परंतु आता असे न वागता जमीनीचं अर्थशास्त्र पहाणे गरजेचे आहे

असा मोलाचा संदेश निवेदक शेतकऱ्यांना देत आहेत. वेळीच सूचना देऊन शेतकऱ्यांना या धोक्यापासून वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत.

लेखकांच्या म्हणजे दिवाकर चौधरींच्या म्हणण्यानुसार जर शेतकऱ्यांनी जर आपली सगळी जमीन विकली आणि पैसे बँकेत ठेवले तर त्याच्या व्याजात तो चांगले जीवन जगू शकेल. मग गुरढोरे, मजुर, पेरणे, नांगरणे, कुळवणे या कटकटी पासून सुटकारा मिळेल. पण सगळ्याच शेतकऱ्यांनी जर असे केले तर गावात जमीन कोण खरेदी करणार, जरी घेतली तर बागायती शेतीला भरपूर दर असतो. बागायतदार शेतकऱ्यांना हे परवडेल पण कोरडवाहू शेतकऱ्यांना हा व्यवहार परवडणार नाही.

पूर्वी मालकांचे आणि मजुरांचे नाते अतूट होते. मालक मजुरांच्याबरोबर प्रेमाने वागे त्यांची काळजी घेई. मजुरही मालकांचा आदर करत. मालकाच्या शेतात प्रामाणिकपणे कष्ट करत. पूर्वी मजुरांकडे उपकाराची जाण होती. आता तसे राहिले नाही. सगळ्यांची नियत बिघडली आहे. कोण कोणाच्या उपकाराची जाण ठेवत नाही. 'कामापुरता मामा आणि ताकापूरती आजी' अशी अवस्था आहे. ह्या नात्यात जर सुधारणा झाली तरच शेतीला बर्कत येईल. नाहीतर कितीही आधुनिक साधने येऊ देत. शेतीची प्रगती होणार नाही आणि शेतकरी सुधारणार नाही.

आता तर आधुनिक पद्धतीचे तंत्रज्ञान आले आहे. ट्रॅक्टर, क्रशर अशी अनेक यंत्रे आली आणि सगळी कामे विना त्रासाची होऊ लागली. सालदार मजुर तर कंबरेवर हात ठेवून फक्त देखरेखीचे काम करू लागले. आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतीच्या कामासाठी मजुर कमी लागत. मजुरांच्या कामासाठी कराव्या लागणाऱ्या मिन्त्या आता कमी झाल्या. कमी वेळेत भरपूर काम या यंत्रांमुळे होऊ लागले.

आता जमीन दिवसेंदिवस नापीक होऊ लागली आहे. त्या जमीनीला विश्रांतीच नाही. कोणते ना कोणते पीक शेतात आहेच आणि त्याबरोबर पाणीही त्यामुळे जमीनी पांचट झाल्या आहेत. वरून औषधाचे फवारे मारल्यामुळे, रासायनिक खते टाकल्यामुळे जमीनीतले गांडूळ, वाणी, उपयोगी कृमी मरून गेले. त्यामुळे जमीनीचा कस कमी होवून उत्पादनात घट झाली.

म्हणजे शास्त्रोक्त अन् नैसर्गिक याच मिश्रण व्हायला पाहिजे होते. परंतु शास्त्रोक्तच्या नावाखाली जमीनीवर अत्याचार झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक खते, बि-बियाणे, औषधे यांचा माफक प्रमाणात वापर करून सेंद्रिय नैसर्गिक शेतीवर भर दिला पाहिजे तरच शेतीत सुधारणा होईल. सकस धान्याचे उत्पादन निघेल. जसजशी वर्ष उलटत गेली तसतसा जमीनीचा उतार कमी झाला. पुन्हा बियाण्यात भेसळ व्हायला लागली. जमीन सकस पिकाऊ होती, तोपर्यंत तिची काळजी घेतली नाही. आता मात्र तिचा पोत पूर्ण बिघडला आहे. त्यामुळे शेती करण्याचा शेतकऱ्यांचा उत्साह कमी झाला आहे. या संदर्भात लेखक दिवाकर चौधरी म्हणतात, ''शेती कऱ्याचा उत्साहाच गणित माणसाच्या वयावऱ्हे अवलंबून नसतं, की जसजसं वय वाढत जातं तसतसा उत्साह कमी होत जातोत् उत्पन्नावऱ्हे ते अवलंबून असतं. जसंजसं उत्पन्न कमी होत जातं तसतसा उत्साह कमी होत जातो.''[५६]

आता या संकरीत प्रकारांनी तर चवच गेली. कसलाच सकसपणा, चवदारपणा यात राहिला नाही. एका वर्षाचे पीक आता तीन-चार महिन्यातच निघू लागले. आता या सर्व गोष्टी मान्य केल्या पाहिजेत आणी नैसर्गिक शेती केली पाहिजे. सरकारनेही या बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. याचा अर्थ फक्त नैसर्गिकच शेती करायची असा नाही. तर संकरित शेती केली पाहिजे पण त्याबरोबर जमीनीचा पोतही सुधारला पाहिजे कारण एवढ्या मोठ्या लोकसंख्येलाही धान्य पुरले पाहिजे.

शेतकऱ्यांच्या कर्जाच्या आकड्याचे चक्र तर फिरतच असते. या व्याजाच्या वाढण्याने शेतकऱ्यांना झोप लागत नाही. जीवनातील बराचसा वेळ हे कर्ज कसे फेडायचे या विचारात घालवतो. अशी अवस्था देशातल्या बऱ्याचशा शेतकऱ्यांची आहे एक नियोजन चुकल की दुसरं चुकत अन् मग ते चुकतच रहात. शेतकऱ्यांना पैसे साठवण्याची अपेक्षा नसते. तर फक्त दोन वेळ जेवण आणि कपडालत्ता एवढेच. शेतकऱ्यांची सुखाची कल्पना एवढीच असते. परंतु एवढ्याशाही अपेक्षा पूर्ण करण्याची ऐपत बऱ्याचशा शेतकऱ्यांची नसते. तर आता त्याचं जगणंच मुश्किल झाले आहे या संदर्भात दिवाकर चौधरी सांगतात की - ''बारदानाचा एक अध्याय त ढोराईचा दुसरा त इक्याचा तिसरा. सकाळ दुपार संध्याकाळ जिंदगीभर अध्यायच अध्याय अन टेंशनच टेंशन.

भर उन्हाया मोटर बयाली टेंशन, पीक उभं रोग पडला टेंशन, फवारा मारा टेंशन, फवारा मारला पाऊस आला टेंशन, बाग उभा भाव डाऊन टेंशन, अरे तेहे बहिनची जिंदगी, जीना यहा और मरना यहा. खुप धंदा निवडला रे गधडीच्या तूनं.''[५७]

शेतकऱ्यांना कर्जबाजारी करणारे अनेक गोष्टी आहेत. त्यात वीज ही एक गोष्ट जबाबदार आहे. वारंवार वीज गेल्यामुळे बागायतदार शेतकऱ्याला खूप टेंशन येत. पाणी असून लाईट विना ते पाजता येत नाही. उन्हाळा, हिवाळा लाईटचा त्रास असतो. पावसाळ्यात मात्र लाईट नेहमी असते. पीकाला पुरेसे पाणी न देता आल्यामुळे पीक उत्पादनात घट होते. कोणत्याच बाजूने शेतकऱ्याना समाधान नाही. इकडे पहावे तर तिकडचे काम रहाते आणि तिकडे पहावे तर इकडचे काम रहाते. अशा परिस्थितीत बळीराजाने नेमके काय करायचे. कोण यांच्याकडे लक्ष देणार. सरकार मदत करते ती पण तेवढ्या पुरती. कायमच्या शेतकरी समस्या दूर करण्यासाठी सरकारने जीवापाड झटणे कार्य करणे आवश्यक आहे.

दिवाकर चौधरींनी ऊस, केळी, कांदा या बागायत पीकांचे केलेले वर्णन अतिशय थोडक्या पण समर्पक शद्वात शद्वबद्ध केले आहे. प्रत्यक्षात बागायत पीके किती पैशे देणारी पीके वाटतात पण हे सर्व वाचल्यानंतर आपल्यासारख्यांना नक्कीच या पीका पाठीमागची सत्यस्थिती काय आहे याचे आकलन होईल.

लेखकांनी प्रत्येक पीकाच्या सत्यस्थितीचे वर्णन केलेले आहे. त्यातून कोणत्या पीकाची कशी अवस्था आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरात काय पडते याचे अतिशय योग्य शद्वात केलेले वर्णन केलेले आहे. लेखकांनी प्रत्येक पीकाचे वर्णन अतिशय परखड, प्रत्येकाला समजेल असे, अत्यंत थोडक्या पण मार्मिक शद्वात समर्पकपणे केले आहे. नाहीतर एका-एका पीकाला अख्खी कादंबरीच लागली असती. जणू काही कृषी खात्याच पुस्तकच असल्यासारखं. कारण कृषी खात्याच्या पुस्तकात प्रत्येक पीकाची सविस्तर माहिती चित्रासह असते. परंतु त्यात शेतकऱ्यांचे मानसिक आंदोलन, त्यांच्या समस्या नसतात. जे शेतकऱ्यांना सर्वात आवश्यक असते तेच नसते. मग त्या पुस्तकातील मोठ मोठे केळीचे घड, मोठ मोठे टमाटे, याचा काय उपयोग. भांडवलच पुरेसे नाही तर मग या वस्तूंचे डोळ्यात भरेल असे आकर्षक उत्पादन कसे काय काढणार. कष्ट करण्याची जिद्द असताना देखील भांडवलाअभावी शेतकरी काहीही करू शकत

नाहीत. भांडवल ही शेतीची सर्वात पहिली गरज आहे. त्याशिवाय शेतकरी काहीही करू शकत नाही.

एकदाच सर्व पुराण आटोपलं. अध्याय पहिला संपला की दुसरा, दुसरा संपला की तिसरा असे एका पाठीमागून एक अध्याय शेतकऱ्यांच्या जीवनाचा पाठपुरावा करत असतात. लेखकांनी या एका-एका समस्येला एक-एक अध्याय असे म्हटले आहे. हा एक अध्याय म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनातील गोष्टीचा छोटासा तुकडाच आहे. असं पदोपदी लाचारीचं जिणं शेतकऱ्यांच्या नशिबी आले आहे. म्हणून फार तर आर्थिक बाजू तर राहूच द्या सामाजिक, राजकीय सर्व क्षेत्रात कोणतचं समाधान नाही. जो तो शेतकऱ्यांचे लचके तोडायला बसलेला. आतापर्यंत लेखकांनी मांडलेले सर्व प्रश्न प्रत्यक्ष अनुभवलेले तर आहेच पण त्याबरोबर ते सर्व शेतकरी बांधवांचेही आहेत.

*****



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# संदर्भ


१) बुझ्वागमन – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १६

२) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ.

३) तत्रैव –दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. २५

४) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १०६

५)तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १२८

६) तत्रैव –दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १००

७) तत्रैव –दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ९८

८) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. २७

९) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ११२

१०) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ११०

११) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १३२

१२) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १३०

१३) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १४

१४) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १३०

१५) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ०७

१६) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ४१

१७) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ८६

१८) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. २३

१९) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ४७

२०) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५६

२१) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १०७

२२) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ८१

२३) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. २३

२४) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५८

२५) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५९

२६) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ८०

२७) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १०१

२८) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५८

२९) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १४७

३०) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १०

३१) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ४२

३२) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५०

३३) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५५

३४) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ९२

३५) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १३५

३६) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १५५

३७) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १५५

३८) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १६४

३९) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १२

४०) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५

४१) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १५

४२) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ३८

४३) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १५

४४) श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी – मराठी विश्वकोष खंड ११,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई. पृ. ६८८

४५) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ३४

४६) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ११५

४७) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ४६

४८) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १५

४९) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. २१

५०) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ३०

५१) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ३६

५२) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ३८

५३) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ४०

५४) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५३

५५) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. ५८

५६) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १५४, १५५

५७) तत्रैव – दिवाकर चौधरी, अनुबंध प्रकाशन, पुणे. प्र.आवृत्ती २६ जाने. २००७, पृ. १६३

******